# महाराष्ट्र विधानपरिषद

## पहिले अधिवेशन, २०२६

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**बुधवार, दिनांक ०४ मार्च, २०२६ / फाल्गुन १३, १९४७ (शके)**

| | | |
|---|---|---|
| **(१)** | **मुख्यमंत्री** | |
| **(२)** | **पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |
| **(३)** | **इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धव्यवसाय विकास, अपारंपारिक ऊर्जा, दिव्यांग कल्याण मंत्री** | |
| **(४)** | **पर्यटन, खनिकर्म, माजी सैनिक कल्याण मंत्री** | |
| **(५)** | **माहिती तंत्रज्ञान, सांस्कृतिक कार्ये मंत्री** | |
| **(६)** | **परिवहन मंत्री** | |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३६**

---

### नागपूर जिल्ह्यातील मिहान प्रकल्पाकरीता अधिग्रहीत केलेल्या जमिनीचा मोबदला प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना मिळाला नसल्याबाबत

**(१) * ६९५४ श्री.कृपाल तुमाने, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) नागपूर व हिंगणा तालुक्यातील कलकुही, खापरी, तेल्हारा, सुमठाणा व दहेगाव या गावांमधील सुमारे २,००० हेक्टर शेतजमीन सन १९९७ मध्ये मिहान प्रकल्पासाठी अधिग्रहीत करण्यात आली असून अधिग्रहणावेळी प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना मोबदला, साडेबारा टक्के विकसित भूखंड व प्रकल्पात नोकरी देण्याची आश्वासने देण्यात आलेली असतानाही प्रत्यक्षात अद्यापही बहुतांश प्रकल्पग्रस्तांना आश्वासित भूखंड व नोकरी देण्यात आलेली नसल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मिहान प्रकल्पग्रस्तांपैकी सुमारे ३०० शेतकऱ्यांना अधिग्रहीत जमिनीचा मूळ मोबदला देखील अद्याप मिळालेला नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकरणाची स्वतंत्र चौकशी करून दोषी असलेल्या संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत तसेच प्रलंबित मोबदला तात्काळ अदा करणे, साडेबारा टक्के विकसित भूखंडांचे त्वरित वाटप करणे व उर्वरित पात्र प्रकल्पग्रस्तांना प्राधान्याने नोकरी देण्याच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१), (२) व (३) मिहान प्रकल्पाकरीता संपादीत, मौजा-कलकुही, खापरी, तेल्हारा, सुमठाणा व दहेगाव या गावांची अनुक्रमे ४५०.५० हे.आर, ४२५.५७ हे.आर, ४६४.७४ हे.आर, १०८.८६ हे. आर व ४०५.२१ हे.आर जमीन संपादीत करण्यात आली असून, या संपादीत जमिनीचा मोबदला जिल्हाधिकारी, नागपूर या कार्यालयामार्फत संबंधित भूधारकांना वाटप करण्यात आला आहे.

वरील प्रकल्पग्रस्तांपैकी ज्यांनी विकसीत भूखंड देणेकरीता विकल्प सादर केला आहे त्यांना मौजा सुमठाणा, तह. हिंगणा येथील एकूण ७७.७३ हेक्टर क्षेत्रात नागरी सुविधेसह अभिन्यास तयार करण्यात आला आहे. शासन पत्र दिनांक ०१/०४/२०२५ नुसार १२.५% विकसीत भूखंडासाठी विकल्प सादर केलेल्या ३६० पात्र प्रकल्पग्रस्तांपैकी, विकास शुल्क रक्कमेची भरणा केलेल्या प्रकल्पग्रस्तांना जमीन भाडेपट्टा करारनामा करुन भूखंडाचा ताबा देण्याची कार्यवाही प्रगतीत आहे.

याशिवाय मिहान प्रकल्पग्रस्तांना पुनर्वसन अनुदानांतर्गत नोकरीऐवजी रुपये ५.०० लक्ष देय करण्यात येत असून, आजपर्यंत २७०१ प्रकल्पग्रस्तांपैकी २०४८ प्रकल्पग्रस्तांना नोकरीऐवजी रुपये ५.०० लक्ष याप्रमाणे एकूण रुपये १०२.४८ कोटी रक्कमेचे वाटप करण्यात आले आहे.

तसेच शासनाव्दारे पदभरती जाहिरातींमध्ये सदर प्रकल्पग्रस्तांसाठी ५% आरक्षण देण्यात आले आहे. त्यानुसार ज्या प्रकल्पग्रस्तांनी नोकरी ऐवजी रुपये ५ लक्ष उचल न करता प्रकल्पग्रस्ताचे प्रमाणपत्राचा दाखला घेतला आहे, त्यांना त्यांचे शैक्षणिक पात्रता, अनुभव व कौशल्य यानुसार शासनाव्दारे करण्यात येत असलेल्या पदभरतीमध्ये अर्ज करता येतो, हे खरे आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## पुणे शहरात गुंगीकारक औषधी गोळ्यांची विक्री करणाऱ्यांवर कारवाई करण्याबाबत

**(२)** * **७३७३ श्री.योगेश टिळेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुणे शहरात नशेसाठी वापरल्या जाणाऱ्या गुंगीकारक औषधी गोळयांची विक्री करणाऱ्या दोन आरोपींना खडक पोलिसांनी अटक केल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, मुख्यतः कोंढवा, काशेवाडी, हडपसर, कॅम्प आणि येरवडा परिसरात सदर औषधी गोळयांची अवैधरित्या विक्री होत असून, कोंढव्यातील घरात सर्वाधिक साठा असून तेथील निट्राझेपाम, नित्झासेन १०, अल्प्राझोलाम ०.५ निट्रोफास्ट इत्यादी प्रकारच्या ६ हजार ९०० गोळ्या छापा टाकून ताब्यात घेण्यात आल्या आहेत, हे ही खरे आहे काय, तसेच सदर जप्त केलेला साठा कोणाकडून खरेदी करण्यात आला याची तपासणी करण्यात आली आहे काय,

(३) असल्यास पुणे शहरात बनावट नशेचे औषध तयार करणाऱ्या तसेच ते वितरीत करणाऱ्या वितरकांसह सदर प्रकरणी आढळून आलेल्या अन्य संबंधित दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) सदर घटनेबाबत दिनांक २५/११/२०२५ रोजी खडक पोलीस स्टेशन,पुणे येथे एन.डी.पी.एस. ॲक्ट १९८५ चे कलम ८(सी), २२(सी),२९ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

(२) व (३) जेधे चौक, स्वारगेट, पुणे येथे रोडलगत दोन व्यक्तींच्या ताब्यात NITRAZEPAM TABLET I.P. NITZASCEN-१० व NITRAZEPAM TABLET I.P. NITROFAST-१० या गोळ्या तसेच अधिक तपासात त्यापैकी एका व्यक्तीच्या राहत्या घरातून NITRAZEPAM TABLET I.P. NITZASCEN-१० व Alprazolam Tablet I.P. ०.५ mg ALPRASCEN-०.५ CBT २५-१०९९ या रुपये २७,०९५/- किंमतीच्या एकूण ६९०० गोळ्या विनापरवाना व डॉक्टरांच्या प्रिस्क्रिप्शन शिवाय नशा करणेसाठी, बेकायदेशीर खरेदी विक्री करणेच्या उद्देशाने कब्जात बाळगताना मिळून आल्याने त्यांच्या विरुध्द उपरोक्त प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

सदर गुन्ह्यात पाच आरोपी निष्पन्न करण्यात आले असून दोन आरोपींना अटक करण्यात आली व तीन आरोपींचा शोध सुरू आहे. तसेच सदर गुन्ह्यात एकूण पाच आरोपींविरुध्द मा.न्यायालयात दिनांक २१/०१/२०२६ रोजी दोषारोप पत्र सादर करण्यात आले आहे.

सदर गुन्ह्याच्या तपासात उपरोक्त गोळ्या सी.बी. हेल्थ केअर, हिमाचल प्रदेश यांनी ॲबिनोक्स हेल्थ केअर, गुजरात यांना वितरणासाठी दिले असल्याची माहिती प्राप्त झाली असून त्यानुषंगाने सदर गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.

तसेच पुणे शहरात बनावट नशेची औषध तयार करणारी कोणतीही कंपनी आढळून आलेली नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## चंद्रपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांवर सावकारी कर्जासह मायक्रो फायनान्सच्या कर्जाचा भार वाढत असल्याबाबत

**(३) * ६५७४ श्री.मिलिंद नार्वेकर, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.इद्रिस नायकवडी, श्री.सतिश चव्हाण, श्री.कृपाल तुमाने, डॉ.(श्रीमती) मनिषा कायंदे, श्री.हेमंत पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.शशिकांत शिंदे, श्री.सदाशिव खोत, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, श्रीमती उमा खापरे, डॉ.परिणय फुके, श्री.अमित गोरखे, श्रीमती चित्रा वाघ, ॲड.निरंजन डावखरे, श्री.विक्रांत पाटील, श्री.संजय केणेकर, श्री.सत्यजीत तांबे, श्री.पंकज भुजबळ :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर जिल्हातील मिंथुर गावातील श्री.रोशन सदाशिव कुडे या शेतकऱ्याने सावकाराकडून घेतलेले १ लाख रुपयांचे कर्ज अवाजवी व्याजामुळे ७४ लाख रुपयांपर्यंत गेल्याने त्याची परतफेड करण्यासाठी शेतकऱ्याला शेतजमीन, शेतीची वाहने, घरातील सामानाची विक्री करावी लागल्याचे तसेच त्या शेतकऱ्याला आग्नेय आशियातील मानवी अवयवांची 'सप्लायर' किंवा 'ट्रान्झिट कंट्री' अशी ओळख असलेल्या कंबोडियामध्ये नेण्यात येऊन स्वत:ची एक किडनी विकावी लागली असून, त्यातून प्राप्त झालेल्या पैशांतून सावकाराने त्याच्या कर्जाची रक्कम वसूल केल्याची घटना दिनांक १६ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, चंद्रपूर जिल्ह्यातील शेतकऱ्यांवर सावकारी कर्जासह मायक्रो फायनान्सच्या कर्जाचा मोठा भार असून शेतकरी व्याजाच्या रकमेचा भरणा करण्यास असमर्थ ठरल्यास त्याला व्याज रकमेची तरतूद करण्यासाठी पुन्हा नव्याने कर्ज घेण्यास सांगून त्यास कर्जाच्या चक्रव्यूहात अडकविले जात असून, गरीब व

कर्जबाजारी शेतकऱ्यांना हेरून खाजगी सावकारीचे कर्ज फेडण्यासाठी त्यांच्या किडन्या ८ लाख ते १० लाख रूपयांना विकण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, चंद्रपूर जिल्ह्यातील ब्रह्मपुरी (ता.नागभीड) येथील एका शेतकऱ्यांने सावकारी कर्जाच्या तगाद्याला वैतागून कर्जाचे पैसे देण्यासाठी स्वतःची किडनी विकल्याचे यापूर्वी माहे ऑक्टोबर, २०२४ मध्येदेखील निदर्शनास आले होते, तसेच मिंथूर व नवेगांव पांडव (ता.नागभीड) या जुळया गावातील ५१३ शेतकरी विविध कार्यकारी सहकारी सेवा सोसायट्यांचे कर्जदार असून यापैकी काही शेतकऱ्यांनी किडनी विकून कर्जाची परतफेड केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, रिझर्व्ह बँकेच्या मार्गदर्शक सूचनेनुसार मायक्रो फायनान्स कंपन्यांना १४ ते १६ टक्के व्याजदर आकारण्यास परवानगी असून, कंपनी प्रतिनिधी घरी येऊन कमी कागदपत्रांमध्ये कर्जवाटप केले जाते, परंतु कर्जाचे हप्ते थकल्यानंतर याच मायक्रो फायनान्स कंपन्याद्वारे चक्रवाढ व्याजाची व मध्यस्थी / एजंटच्या टक्केवारीची आकारणी करण्यात येत असल्याने कर्जदारांना ३४ ते ३६ टक्क्यांपर्यंत व्याजाने कर्जाची परतफेड करावी लागते असल्याने राज्यात शेतकरी आत्महत्या अधिक होण्यामागे खासगी सावकारी व मायक्रो फायनान्स कंपनीद्वारे चक्रवाढ व्याज पध्दतीने कर्ज पुरवठा होणे हे देखील प्रमुख कारण असून, दुष्काळग्रस्त परिस्थितीमुळे व नापिकीमुळे अनेक गावातील शेतकरी अडचणीत असून कर्जबाजारी गरीब शेतकरी तसेच बेरोजगार नागरिकांना लक्ष्य करून त्यांच्या अवयवाची तस्करी करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, चंद्रपूर पोलिसांनी सदर प्रकरणी मुख्य सूत्रधार डॉ. कृष्णा आणि रामकृष्ण संज या दोन आरोपींना अटक केली असून, सोलापूर येथील एका व्यक्तीच्या मदतीने अनेकांना आमिष दाखवून किडनी विक्रीसाठी प्रवृत्त करून कंबोडियात पाठविले जात असून त्यात जवळपास १६ जणांच्या किडन्यांची विक्री केल्याचे तसेच किडनी विक्री प्रकरणात देशातील नामांकित रुग्णालये, डॉक्टर आणि दलालांची साखळी असून, तामिळनाडूतील त्रिची शहरातील स्टार किम्स हॉस्पिटलचे संचालक व दिल्ली येथील डॉ.रवींद्रपाल सिंग यांना अवैध किडनी प्रत्यारोपण प्रकरणी अटक करण्यात आले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(५) असल्यास, राज्यातील गरीब शेतकऱ्यांना बेकायदेशीर सावकारी व मायक्रो फायनान्स कंपनीच्या कर्जामुळे आत्महत्या किंवा अवयव विक्रीसारखे टोकाचे निर्णय घ्यावे लागू नयेत यासाठी उक्त सावकार व कंपन्या यांचेवर शासनाने कठोर नियमावलीद्वारे नियंत्रण आणून जिल्हा व तालुका स्तरावर विशेष सावकारी प्रतिबंध मोहीम राबविण्यात येत आहे काय, तसेच राज्यातील शेतकऱ्यांकडून बेकायदेशीरपणे व्याजाच्या रकमेची वसुली करणारे सावकार व मायक्रो फायनान्स कंपन्यांची यादी तयार करून त्यांच्यावर कठोर कारवाई करण्याबाबत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(६) असल्यास, शासनाने सदर प्रकरणाची गंभीर दखल घेऊन या प्रकरणाची सखोल व निष्पक्ष चौकशी केली आहे काय, सदर चौकशीत कोणत्या बाबी निष्पन्न झाल्या आहेत, त्यानुसार संबंधित आरोपींवर कोणती कठोर कारवाई केली तसेच किडनी विक्रीचे स्कॅम रोखण्यासाठी शासनाने कोणती ठोस कार्यवाही केली वा करण्यात येत आहे तसेच पीडित शेतकऱ्याच्या पुनर्वसनासाठी शासनाकडून कोणत्या प्रकारची मदत करण्यात आली आहे,

(७) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) फिर्यादी यांनी गुन्ह्यातील सहा आरोपीतांकडून एकूण ९.१५ लाख इतके सावकारी कर्ज घेतले होते. त्या कर्जाच्या व्याजासह त्यांनी आरोपींना ४८.५३ लाख ची रक्कम व १ एकर जमीन परतफेड म्हणून दिली. तरीही आरोपींचा पैशांसाठी सततचा पाठपूरावा सुरूच राहिल्याने त्यास कंटाळून फिर्यादीने मध्यस्थाच्या माध्यमातून कंबोडिया येथे जाऊन Preah Ket Mealea Hospital, Phnom Penh, Cambodia या हॉस्पिटलमध्ये स्वतःची किडनी रुपये ८ लाख मध्ये दिनांक १४/१०/२०२४ रोजी विकली व सदरची रक्कम ६ आरोपीतास देऊन त्यांचे कर्ज फेडले.

तदनंतर, सदर प्रकरणी दिनांक १६/१२/२०२५ रोजी फिर्यादी यांनी दिलेल्या तोंडी रिपोर्टच्या आधारे पो.स्टे. ब्रम्हपूरी येथे भा.दं.सं. कलम ३२६, ३८७, ३४२, २९४, ५०६, १२०(ब) व महाराष्ट्र सावकारी अधिनीयम २०१४ मधील कलम ३९, ४४ अन्वये अप.क्र. ६५४/२०२५ नोंदविण्यात आला आहे.

तसेच, सदर प्रकरणी सावकारीच्या पैशांची परतफेड करण्यासाठी फिर्यादी यांनी स्वत:च्या शरीरामधील किडनी विकल्याचे निदर्शनास आल्याने सदर गुन्ह्यात दिनांक २१/१२/२०२५ रोजी भा.न्या.सं. २०२३ चे कलम १४३(१)(a)(f), १४३(२) व मानवी अवयव व उती प्रत्यारोपन अधिनीयम १९९४ चे कलम १८,१९ समाविष्ट करण्यात आले आहे.

तसेच, सदर गुन्ह्याचे तपासा दरम्यान फिर्यादीसह इतर राज्यातील अन्य ४ पीडित व्यक्तींना देखील आरोपीतांनी किडनी विक्री करण्यास प्रवृत्त केल्याचे दिसून आल्याने सदर प्रकरणात भा.न्या.सं.२०२३ च्या कलम १४३(३) अन्वये दुसऱ्यांदा कलमवाढ करण्यात आली आहे.

तसेच, नवेगांव पांडव (ता.नागभीड) या जुळया गावातील ५१३ शेतकरी विविध कार्यकारी सहकारी सेवा सोसायट्यांचे कर्जदार असून यापैकी काही शेतकऱ्यांनी किडनी विकून कर्जाची परतफेड केली याबाबत कोणतीही तक्रार प्राप्त नाही. तसेच, दाखल गुन्हयाच्या तपासा दरम्यान रोशन सदाशिव कुळे यांचे व्यतिरिक्त इतर कोणीही किडनी विकून कर्जाची परतफेड केलेबाबत निष्पन्न झालेले नाही.

(३) मायक्रोफायनान्स कंपन्यांवर रिझर्व बँकेचे प्रत्यक्ष नियंत्रण असून रिझर्व बँकेने दिनांक १४ मार्च, २०२२ रोजी मायक्रोफायनान्स कंपन्यांबाबत मार्गदर्शक सूचना प्रसिध्द केल्या आहेत. अशा मायक्रोफायनान्स कंपन्यांकडून अल्पउत्पन्न गटाला वाजवी दरात कर्जपुरवठा उपलब्ध करुन देण्यात येतो. मायक्रोफायनान्स कंपन्या तारणाशिवाय सदर कर्जपुरवठा करतात. मायक्रोफायनान्स कंपन्यांनी अकारावयाच्या व्याजदरावर रिझर्व बँक नियंत्रण ठेवते. मायक्रोफायनान्स कंपन्यांनी व्याजदरात बदल केल्यास त्याबाबत कर्जदारास तात्काळ कळविणे बंधनकारक आहे. तसेच, मायक्रोफायनान्स कंपन्यांनी कर्जवसूली करतांना पालन करावयाच्या मार्गदर्शक सूचनाही रिझर्व बँकेने दिलेल्या आहेत.

दिनांक १६/०९/२०१४ च्या शासन अधिसूचनेनुसार सावकारी कर्जासाठी प्रतिवर्षी व्याजदर निश्चित केला असून शेतकऱ्यांकरीता तारण कर्ज ९ टक्के, विनातारण १२ टक्के व शेतकऱ्यांव्यतिरिक्त इतर व्यक्तींना तारण कर्ज १५ टक्के व विनातारण कर्ज १८ टक्के वार्षिक व्याजदर केले आहे. बेकायदेशिर सावकारांवर महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ नुसार कार्यवाही करण्यात येते. त्यानुसार संबंधित तालुका पोलीस स्टेशन मध्ये एकूण १५ गुन्हे नोंदविण्यात आले आहेत. रोशन सदाशिव कुळे, रा. चंद्रपूर यांनी नोंदविलेल्या गुन्हया व्यतिरिक्त चंद्रपूर जिल्हा घटकात किडनी विकल्याची तसेच अवयवाची तस्करी करण्यात येत असल्याबाबत इतर कोणतीही तक्रार प्राप्त नाही. तपासात इतर कोणीही किडनी विकून कर्जाची परतफेड केल्याचे निष्पन्न झालेले नाही.

(४) डॉ. कृष्णा आणि रामकृष्ण संचू हे एकाच व्यक्तीचे नाव असून त्याचे नांव रामकृष्ण मल्लेशम सुंचू, सोलापुर रहिवासी असून त्याने स्वतःची किडनी कंम्बोडिया येथे विकल्याचे तपासात कबुल केलेले आहे व त्याने इतर चार व्यक्तींची कम्बोडिया येथील Preah Ket Mealea Hospital, Phnom Penh या रुग्णालयामध्ये किडनी विकलेली आहे असे तपासात निष्पन्न झाले आहे.

तामिळनाडूतील त्रिची शहरातील स्टार किम्स हॉस्पीटलचे संचालक डॉक्टर राजरत्नम गोविंदस्वामी, रा. थिलाईनगर यास मा.उच्च न्यायालय, मद्रास बेंच मदुराई, राज्य तामीलनाडू येथून Anticipatory Transit Bail (Inter State) मंजूर झाला होता.परंतु अदयापपावेतो हजर झाला नसून फरार आहे. डॉ. रवीद्रपाल सिंग, रा. दिल्ली यांना अवैध किडनी प्रत्यारोपण प्रकरणी मा.उच्च न्यायालय, खंडपिठ नागपूर यांनी अंतरिम जामीन मंजूर केलेला असून अदयापपर्यंत त्यांना अटक करण्यात आलेली नाही.

(५)चंद्रपुर जिल्ह्यातील पोलीस स्टेशन, बिट अंमलदार मार्फत गावा-गांवातील नागरिकांशी संवाद साधुन तसेच सोशल मिडीया प्लॅटफॉर्मद्वारे सावकारी कर्जासंबंधाने मार्गदर्शन व जनजागृती करीत आहेत. सावकारी कर्जामुळे कोणीही आत्महत्या किंवा अवयव विक्री करणार नाही याकरीता पोलीस स्टेशन / जिल्हास्तरावर माहिति देण्यात येवून काही तक्रारी असल्यास प्रत्यक्षरित्या हजर राहून किंवा व्हॉटसअप कमांक ७८८७८९०१०० यावर माहिती देण्याबाबत कळविण्यात आले आहे.

यासंबंधाने जनजागृती साठी व्हॉटसॲप, इंस्टाग्राम व फेसबुक इत्यादी ठिकाणी समाज माध्यमावर चंद्रपुर जिल्हा पोलीस दलातर्फे यासंबंधाने व्हिडिओ व फोटो प्रसारीत करून जनजागृती करण्यात येत आहे.

दिनांक १९/१२/२०२५ रोजी जिल्हाधिकारी, चंद्रपूर यांचे अध्यक्षतेखाली महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ च्या कायदयातील तरतुदीची अंमलबजावणी करण्याबाबत जिल्ह्यातील सर्व परवानाधारक सावकार व संबंधित अधिकारी यांचेसह आढावा बैठकीचे आयोजन करून सुचना व मार्गदर्शन करण्यात आले आहे.

तसेच जनसामान्यांना सावकारी बाबत तक्रार असल्यास सबंधीत पोलीस स्टेशन किंवा पोलीस अधीक्षक कार्यालयाला लेखी किंवा तोंडी तक्रार देण्याबाबत जनजागृत करण्यात आलेले आहे.

(६) सदर प्रकरणाच्या चौकशीत श्री.रोशन कुळे यांनी दिनांक १२/०१/२०२६ च्या अर्जान्वये जिल्हा उपनिबंधक, चंद्रपूर यांच्याकडे सावकारीच्या ओघात संपादन केलेली त्यांच्या कुटूंबाची मालमत्ता परत करण्याबाबत अर्ज दाखल केला आहे. जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, चंद्रपूर यांनी महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ च्या कलम १८(२) अन्वये सदर प्रकरणावर अर्जदार व गैरअर्जदार यांना नोटीस बजावली असून सुनावणीची कार्यवाही सुरू आहे.

तसेच अनधिकृत सावकारी व्यवसाय करणाऱ्या व्यक्तींवर कारवाई करण्याच्या उद्देशाने, सावकारी व्यवसायावर योग्य नियंत्रण ठेवण्यासाठी सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग, मंत्रालय यांनी दिनांक ०१/०३/२०१७ व दिनांक १७/०७/२०२५ रोजीच्या शासन निर्णयान्वये समिती गठित करण्यात आली आहे. सदर समितीस आवश्यकतेनुसार अवैध सावकारी रोखण्यासाठी भरारी पथके निर्माण करणे तसेच अवैध सावकाराविरुध्द कार्यवाहीत सुसुत्रता आणण्याचे अधिकार देण्यात आले आहेत.

तसेच, बेकायदेशीर व अवैध सावकारी चे प्रस्थ मोडीत काढण्यासाठी घटक प्रमुखांना वेळोवेळी सुचना देण्यात आल्या आहेत.

तसेच, चंद्रपूर जिल्ह्यातील शेतकऱ्याने सावकारी कर्ज फेडण्यासाठी किडनी विकल्याच्या घटनेची निष्पक्ष, सखोल व व्यापक चौकशी करण्यासाठी पोलीस महासंचालक यांच्या स्तरावरुन दिनांक ३०/१२/२०२५ रोजीच्या आदेशान्वये अपर पोलीस अधीक्षक, चंद्रपूर यांच्या अध्यक्षतेखाली विशेष तपास पथकाची स्थापना करण्यात आली आहे. त्यानुसार सदर प्रकरणाचा विशेष तपास पथकामार्फत सखोल व व्यापक तपास सूरु आहे.
(७) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## राज्य मार्ग परिवहन महामंडळांतर्गत चालक - वाहक विश्रांतीगृहांची दुरवस्था झाल्याबाबत

**(४) * ७४९५ श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ अंतर्गत एकूण २४७ आगार व ५७८ बसस्थानके कार्यरत असून त्यातील ३६२ बसस्थानकांवर चालक-वाहकांसाठी विश्रांतीगृहे उपलब्ध करून देण्यात आलेली आहेत, तथापि, सदर ३६२ विश्रांतीगृहांपैकी बहुतांश ठिकाणी पिण्यायोग्य पाण्याची अनुपलब्धता, स्वच्छतागृहांची दुरवस्था, नियमित साफसफाईचा अभाव तसेच सुरक्षिततेच्या दृष्टीने आवश्यक मूलभूत सुविधा नसल्यामुळे चालक-वाहकांना सन्मानजनक वागणूक व सुरक्षित विश्रांती मिळत नसल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या बसेसच्या चालक-वाहकांवर उन्हाळा, सततचा पाऊस व धोकादायक रस्त्यांवर प्रवासी वाहतुकीची जबाबदारी असताना, विश्रांतीगृहांच्या दयनीय अवस्थेमुळे त्यांना पुरेशी विश्रांती मिळत नसल्याने त्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत असल्याचे तसेच बसेसच्या वाढत्या दुर्घटनामुळे प्रवाशांची सुरक्षितता धोक्यात आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, राज्यातील ३६२ बसस्थानकांसह सर्व बसस्थानकांवर सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा कणा असलेल्या चालक-वाहकांना अद्ययावत मूलभूत सुविधांयुक्त विश्रांतीगृहे उपलब्ध करून देण्याकरीता शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, सदर विश्रांतीगृहांच्या सुधारणा-नवीकरणासाठी तातडीने निधी मंजूर करून किती कालमर्यादेत कामे सुरू करण्यात येणार आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक :** (१) व (२) रा.प. महामंडळाअंतर्गत एकूण ५९८ बसस्थानक व २५२ आगार कार्यान्वित असून त्यात विविध ठिकाणी आवश्यकतेनुसार / उपलब्धतेनुसार चालक व वाहक विश्रांतीगृहे बांधण्यात आली आहेत.
(३), (४) व (५) रा.प.महामंडळाच्या बसस्थानक, आगार इ. च्या नुतनीकरण / पुनर्बांधणीची कामे शासन निधी अंतर्गत तसेच सार्वजनिक-खाजगी सहभाग तत्वावर प्रस्तावित करण्यात येत असून चालक वाहक विश्रांतीगृहे अद्यावत करणे, त्यात आवश्यक त्या मूलभूत सुविधा पुरविणेची कामे प्राधान्याने हाती घेण्यात येत आहे.

प्रायोगिक तत्वावर ठाणे येथील खोपट व मुंबई विभागातील मुंबई सेंट्रल येथील चालक व वाहक विश्रांतीगृहाचे अत्याधुनिक पध्दतीने आधुनिकीकरण करण्यात आलेले आहे. त्यामध्ये प्रामुख्याने बंक बेड, एसी इ. सुविधांचा समावेश करण्यात आलेला आहे. त्याच धर्तीवर रा.प.महामंडळातील चालक व वाहक विश्रांतीगृहाचे आधुनिकीकरण करण्याचे प्रयोजन आहे.

-----------------

## राज्यातील गृहनिर्माण सोसायट्यांमधील उद्वाहनांची नियमित देखभाल-दुरुस्ती करण्याबाबत

**(५) * ६८१६ श्री.श्रीकांत भारतीय :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील अनेक गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये उदवाहनांची वार्षिक देखभाल व दुरुस्ती नियमितपणे न केल्याने उदवाहनांमध्ये होणाऱ्या तांत्रिक बिघाडांमुळे अनेक अपघात होऊन नागरिकांचा जीव धोक्यात येत असून पिंपरी-चिंचवड शहरातील एका सोसायटीत उदवाहन दुर्घटना घडल्याचे माहे ऑक्टोबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील सर्व गृहनिर्माण सोसायट्यांमध्ये उदवाहनांच्या वार्षिक देखभाल व तपासणीबाबत शासनाने नियम व अटी किंवा मार्गदर्शक सूचना दिल्या आहेत, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर नियमांचे पालन करित नसलेल्या सोसायट्यांविरुध्द शासनाने आतापर्यंत कोणती कारवाई केली तसेच नागरिकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने उदवाहनांमध्ये सेन्सर, अलार्म सिस्टीम इत्यादी आधुनिक तंत्रज्ञान अद्ययावत करण्याच्या अनुषंगाने आदर्शवत नियमावली तयार करून त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी सुरु करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) पिंपरी-चिंचवड परिसरातील एका सोसायटीमध्ये माहे, ऑक्टोबर-२०२५ मध्ये उद्वाहन अपघात झाला असल्याचे निदर्शनास आले आहे.

(२) महाराष्ट्र उद्वाहन अधिनियम, १९३९ व त्याअंतर्गतचे महाराष्ट्र उद्वाहन नियम, १९५८ नुसार उद्ववाहनांचे नियतकालिक निरीक्षण केले जाते.

(३) व (४) संबंधित क्षेत्रिय स्तरावरील विद्युत निरीक्षक कार्यालयाकडून महाराष्ट्र उद्वाहन अधिनियम, १९३९ मधील कलम ११ मधील तरतूदीनुसार उद्वाहनाचे नियतकालिक निरीक्षण केली जातात. सदर उद्वाहनाचे निरक्षणा दरम्यान काही त्रुटी आढळून आल्यास उद्वाहन ठेकेदार व मालकास याबाबत लेखी त्रुटीचे पत्र दिले जाते.

तसेच नागरिकांच्या सुरक्षितेच्या दृष्टीने (Overload Device) तसेच स्वयंचलित आपत्कालीन सहाय्य यंत्रणा (Automatic rescue device) या सारख्या यंत्रणेचा वापर तसेच गृहनिर्माण सोसायट्यांमधील उद्वाहनामध्ये नागरिकांच्या सुरक्षितेच्यासाठी CCTV चा वापर करण्याबाबतच्या विद्युत निरीक्षक (उद्वाहन), मुंबई यांनी अनुक्रमे दिनांक ३/११/२०१२ व दिनांक ३०/०४/२०१५ रोजीच्या परिपत्रकान्वये सूचना दिल्या आहेत.

यापूर्वी उद्वाहनाच्या कामकाजाकरीता २ विद्युत निरीक्षक (उद्वाहन) व इतर ६९ तांत्रिक पदे मंजूर होती. अधिकाधिक उद्वाहनांचे वार्षिक निरीक्षण करण्यासाठी जास्तीचे मनुष्यबळ उपलब्ध होण्याच्या दृष्टीने

शासन अधिसूचना दिनांक २८/०४/२०२५ अन्वये उद्वाहनविषयक कामकाजाचे विभाग/ जिल्हास्तरावर विकेंद्रीकरण करण्यात आले आहे. यामुळे एकूण ५१९ इतकी मंजूर पदे उपलब्ध झालेली आहेत.

-----------------

## पुसेगांव (जि.सातारा) पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध व्यवसाय सुरु असल्याबाबत

**(६) * ७४६१ श्री.शशिकांत शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुसेगांव (जि.सातारा) पोलीस ठाण्याच्या हद्दीत मोठ्या प्रमाणात अवैध व्यवसाय सुरु असल्याचे माहे डिसेंबर,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक यांच्या सहमतीने कार्यक्षेत्रात सर्रासपणे अवैध व्यवसाय सुरु असल्याने महिलांची सुरक्षितता धोक्यात आली असून, शेतकऱ्यांच्या म्हशी, विद्युत पंप, केबल चोरीला जाणे इ. घटना घडत असल्याचे तसेच सदर अवैध व्यवसायात तरुण मुलांचा सहभाग असल्याचे समोर आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, पुसेगांव (जि.सातारा) पोलीस ठाण्याच्या हद्दीत अवैध व्यवसायांच्या आठवड्याची वसुली एका वेटरद्वारे गोळा केली जात असून खाकी वर्दीचा वापर गुन्हेगारांवर धाक निर्माण करण्यासाठी न होता त्यांना अप्रत्यक्षरित्या संरक्षण देण्यासाठी होत असून याबाबत शासनाने सखोल चौकशी करून संबंधित दोषींविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) पुसेगांव पोलीस ठाणे हद्दीत माहे जानेवारी २०२५ ते डिसेंबर २०२५ या कालावधीत दारुबंदी या शिर्षाखाली एकूण ४७ गुन्हे दाखल आहेत. त्यापैकी सर्वच दाखल ४७ गुन्हे उघड करुन सदरच्या गुन्ह्यात एकूण ४७ आरोपी निष्पन्न करण्यात आले असून सर्व गुन्ह्याचे दोषारोपपत्र मा.न्यायालयात दाखल करण्यात आले आहे व एकूण ४८,७१९/- इतका मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

तसेच जुगार या शिर्षाखाली एकूण १३ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. त्यापैकी सर्वच १३ गुन्हे उघड करुन सदरच्या गुन्ह्यात एकूण १८ आरोपी निष्पन्न करण्यात आले असून सर्व गुन्ह्यांचे दोषारोपपत्र मा.न्यायालयात दाखल करण्यात आले आहे व एकूण ४८,४७०/- इतका मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

(२) सन २०२५ मध्ये पुसेगाव पोलीस ठाणे हद्दीत महिला अत्याचार या शिर्षाखाली एकूण १२ गुन्हे दाखल असून सदर गुन्ह्याचा तपास करुन सर्वच १२ गुन्ह्यांची उकल करण्यात आली आहे. सदरच्या १२ गुन्ह्यांपैकी ५ गुन्ह्यांमध्ये एकूण ७ निष्पन्न आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांच्याविरुध्द मा.न्यायालयात दोषारोपपत्र दाखल करण्यात आले आहे. उर्वरित ५ गुन्ह्यांचे "क" फायनल रिपोर्ट मा.न्यायालयात सादर करण्यात आले आहे.

तसेच जनावर चोरी, विद्युत पंप चोरी, केबल चोरी या शिर्षाखाली सन २०२५ मध्ये एकूण १० गुन्हे दाखल असून सर्वच गुन्ह्यांचा तपास पूर्ण करुन एकूण १० गुन्ह्यांपैकी ७ गुन्ह्यांचे दोषारोपपत्र मा.न्यायालयात दाखल करण्यात आले आहेत व उर्वरित ३ गुन्ह्यांचे "अ" फायनल रिपोर्ट मा.न्यायालयात दाखल करण्यात आले आहेत.

पुसेगाव पोलीस ठाणे कार्यक्षेत्रातील अवैध धंद्यांचे समुळ उच्चाटन करण्याच्या दृष्टीने सहाय्यक पोलीस निरीक्षक सदैव प्रयत्नशिल असून त्यांनी गोपनिय बातमीदार यांच्या संपर्कात राहुन अवैध व्यवसाय करणाऱ्या व्यावसायीकांच्या हालचालींवर लक्ष ठेवुन दारु, जुगार, मटका, ऑनलाईन चक्री गेम अशाप्रकारच्या अवैध व्यवसायांवर परिणामकारक छापे टाकुन वेळोवेळी कारवाई करुन अवैध धंद्यांचे समुळ उच्चाटन करण्याचे दृष्टीने सर्वोतोपरी प्रयत्न केला असल्याचे पोलीस अधीक्षक, सातारा यांच्याकडुन दिनांक १८/०२/२०२६ च्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे.

(३) सदर प्रकरणी पोलीस अधीक्षक यांच्या कडून स्थानिक गुन्हे शाखेमार्फत सखोल चौकशी करण्यात आली आहे तसेच गोपनिय बातमीदारांमार्फत सुध्दा शहानिशा करण्यात आलेली आहे. तसेच याबाबत उपविभागीय पोलीस अधिकारी, सातारा ग्रामीण विभाग, कँम्प कोरेगाव यांच्यामार्फत प्राप्त अहवालानुसार अवैध व्यवसायांची वसुली वेटरद्वारे होत असल्याचा असा कोणताही प्रकार निदर्शनास आलेला नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अचलपूर (जि.अमरावती) तालुक्यातील पशुवैद्यकीय दवाखान्यांतील रिक्त पदे भरण्याबाबत

**(७)** * **७६९७ श्री.संजय खोडके :** सन्माननीय **पशुसंवर्धन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) अचलपूर (जि.अमरावती) तालुक्यातील ग्रामीण भागात पशुवैद्यकीय दवाखान्यात मोठ्या प्रमाणात पदे रिक्त असून, सदर दवाखान्यात पशुवैद्यकीय अधिकारी उपलब्ध नसल्यामुळे गत काही महिन्यांमध्ये पशुधनाच्या लंपी आजारावर उपचार होत नसल्याने अनेक पशु दगावले असल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जनावरांना योग्य ते औषधोपचार उपलब्ध होण्याच्यादृष्टीने पशुवैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांची रिक्त पदे भरण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) अचलपूर (जि.अमरावती) तालुक्यातील ग्रामीण भागात पशुवैद्यकीय दवाखान्यात मोठ्या प्रमाणात पदे रिक्त आहेत, ही वस्तुस्थिती आहे. सदर रिक्त पदे भरण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे मागणीपत्र सादर करण्यात आले असून, आयोगाकडून भरती प्रक्रिया सुरू आहे.

पदे रिक्त असली तरी पशुवैद्यकीय सेवांवर परिणाम होऊ नये, म्हणून रिक्त पदांचा अतिरीक्त कार्यभार नजीकच्या पशुवैद्यकीय अधिकारी यांच्याकडे सोपवून पशुपालकांना पशुवैद्यकीय सेवा पूरविण्यात येत आहेत. याशिवाय तालुक्यामध्ये मुख्यमंत्री पशुस्वास्थ्य योजनेतंर्गत फिरत्या दवाखान्यांमार्फत पशुपालकांच्या दारात पशुवैद्यकीय सेवा आवश्यकतेनुसार पुरविल्या जातात.

(२) पशुसंवर्धन विभागातील रिक्त पदे भरण्याच्या अनुषंगाने सरळसेवा पदभरतीने सहायक आयुक्त पशुसंवर्धन (गट-अ) संवर्गाची ३०८ रिक्त पदे व पशुधन विकास अधिकारी (गट-अ) संवर्गाची २७९५ रिक्त पदे भरण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे मागणीपत्र पाठविण्यात आले असून लोकसेवा आयोगाकडून जाहिरात प्रसिध्द करण्यात आली आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील अल्पवयीन मुली बेपत्ता होण्याच्या घटना रोखण्यासाठी उपाययोजना करण्याबाबत

**(८) * ७१८४ ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.विक्रांत पाटील, श्रीमती चित्रा वाघ, श्री.सदाशिव खोत, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्रीमती उमा खापरे, श्री.संजय केणेकर, श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.इद्रिस नायकवडी, श्री.सतिश चव्हाण :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात सन २०२४-२०२५ या वर्षभरात एकूण ३७ हजार ६९५ मुली आणि महिला बेपत्ता झाल्या असून त्यातील ४ हजार ९६ मुली अल्पवयीन आहेत तर ३३ हजार ५९९ महिला सज्ञान असून, रायगड जिल्ह्यातील १८ वर्षांखालील ७० अल्पवयीन मुली मागील ११ महिन्यांत, मुंबईमध्ये १ नोव्हेंबर ते ६ डिसेंबर या ३६ दिवसात ८२ मुले, नवी मुंबईत माहे जानेवारी ते नोव्हेंबर,२०२५ दरम्यान ४९९ मुले, नागपूर शहरात माहे जानेवारी,२०२४ ते मे,२०२५ या दरम्यान ५ हजार ८९७ व्यक्ती बेपत्ता झाल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या असल्याचे दिनांक २६ डिसेंबर,२०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, राज्यातील अल्पवयीन मुले, मुली व महिला बेपत्ता होण्याच्या गंभीर व चिंताजनक घटनांमुळे अल्पवयीन मुलांची सुरक्षितता धोक्यात आली असल्याचे तसेच राज्यात अनेक ठिकाणी नवजात मुलांची विक्री करणाऱ्या टोळया कार्यरत असून माहे डिसेंबर,२०२५ मध्ये बदलापूर शहरातील एका दलाल महिलेसह काही जणांना पोलिसांकडून अटक करण्यात आली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील गेल्या दोन वर्षात बेपत्ता झालेल्या किती मुले,मुली व महिलांचा तपासाअंती शोध घेण्यात आला आहे तसेच अद्याप बेपत्ता असलेली मुले,मुली व महिलांचा शोध घेण्यासाठी शासनाकडून कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, शासनाने अल्पवयीन मुले, मुली तसेच महिला बेपत्ता होण्याच्या गंभीर प्रकरणांची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले आहे, सदर बेपत्ता होण्याच्या घटना रोखण्याकरीता व नवजात मुलांची विक्री करणाऱ्या टोळयांचा बंदोबस्त करण्याबाबत तसेच अल्पवयीन मुलांच्या व मुलींच्या सुरक्षिततेसाठी विशेष मोहीम, पथके किंवा प्रतिबंधात्मक उपाययोजना शासन राबविणार आहे काय,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) महाराष्ट्र राज्यात सन २०२४-२५ मध्ये बेपत्ता व मिळून आलेल्या महिला व अल्पवयीन मुलींची माहिती पुढीलप्रमाणे:-

| कालावधी | हरविलेल्या महिला | मिळुन आलेल्या महिला | हरविलेल्या मुली (अल्पवयीन) | मिळुन आलेल्या मुली (अल्पवयीन) |
|---|---|---|---|---|
| २०२४ | ४५६६२ | ३०८७७ | ११३१६ | ८४७५ |
| २०२५ | ४८२७८ | ३६५८१ | १२११३ | १०२९५ |

सन २०२४-२०२५ या वर्षांत रायगड जिल्ह्यात हरविलेल्या व मिळुन आलेल्या अल्पवयीन मुलींची माहिती खालीलप्रमाणे:-

| कालावधी | हरविलेल्या अल्पवयीन मुली | मिळुन आलेल्या अल्पवयीन मुली |
|---|---|---|
| जानेवारी ते नोव्हेंबर २०२५ | ७० | ६६ |

मुंबई शहर, पोलीस आयुक्तालया अंतर्गत हरविलेल्या व मिळुन आलेल्या अल्पवयीन मुला/मुलींची माहिती खालीलप्रमाणे:-

| कालावधी | हरविलेल्या | | मिळून आलेल्या | |
|---|---|---|---|---|
| | मुले | मुली | मुले | मुली |
| १ नोव्हेंबर, २०२५ ते ६ डिसेंबर, २०२५ | १२० | १८२ | ११८ | १७९ |
| एकूण | ३०२ | | २९७ | |

नवी मुंबई, पोलीस आयुक्तालया अंतर्गत हरविलेल्या मुलांची माहिती खालीलप्रमाणे:-

| कालावधी | हरविलेल्या | | मिळून आलेल्या | |
|---|---|---|---|---|
| | मुले | मुली | मुले | मुली |
| जानेवारी ते नोव्हेंबर २०२५ | १७२ | ३४७ | १६७ | ३२७ |
| एकूण | ५१९ | | ४९४ | |

नागपूर, पोलीस आयुक्तालया अंतर्गत बेपत्ता झालेल्या व्यक्तींची माहिती खालीलप्रमाणे:-

बेपत्ता व्यक्तींचा तपशिल

| कालावधी | हरविलेल्या व्यक्ती | मिळून आलेल्या व्यक्ती |
|---|---|---|
| जानेवारी, २०२४ ते मे, २०२५ | ५८८६ | ५१६९ |

(२), (३) व (४) राज्यामध्ये नवजात बालक विक्री बाबत पोलीस अधीक्षक चंद्रपूर, पोलीस आयुक्त मुंबई शहर, ठाणे शहर, पुणे शहर, पिंपरी चिचंवड अशा एकूण ०५ पोलीस घटकात ०५ गुन्हे दाखल आहेत.

तसेच, नवजात बालक विक्री बाबत डिसेंबर २०२५ मध्ये पोलीस आयुक्तालय ठाणे अंतर्गत बदलापुर पश्चिम, पोलीस स्टेशन येथे भारतीय न्याय संहिता कलम १४३, ३(५) सह जुवेनाईल जस्टीस ॲक्ट, २०१५ कलम ८१, ८७ व माहिती तंत्रज्ञान अधिनियम, २००० कलम ६६ (ड) अन्वये गु.र.नं. ४०९/२०२५ दिनांक २४/१२/२०२५ रोजी नोंदविण्यात आला आहे. यामध्ये एकूण ६ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे.

हरविलेल्या मुला/मुलींच्या शोधासाठी महाराष्ट्र राज्यात जुलै २०१५ ते डिसेंबर २०२४ अखेर १३ ऑपरेशन मुस्कान राबविण्यात आली असून त्यामध्ये ४१,१९३ लहान मुले/मुली यांचा शोध घेण्यात आला आहे. सध्या २० जानेवारी ते २० फेब्रुवारी दरम्यान ऑपरेशन मुस्कान १४ मोहिम सुरू असून दिनांक १६/०२/२०२६ पर्यंत ४५४ मुले व ९४७ मुली अशी एकूण १४०१ बालके शोधण्यात आलेली आहेत.

हरविलेल्या महिला व बालकांचा शोध घेण्यासाठी दिनांक १५/०४/२०२५ रोजी परिपत्रक निर्गमित करण्यात आले असून त्यानुसार दिनांक १७/०४/२०२५ ते १५/०५/२०२५ या कालावधीत प्रत्येक पोलीस उपविभाग स्तरावर हरवलेल्या महिला व बालकांचा शोध घेण्यासाठी “ऑपरेशन शोध” ही विशेष मोहिम राबविण्यात आली असून त्या मोहिमे दरम्यान रेकॉर्डवरील ४९६० महिला व १३६४ बालकांचा शोध घेण्यात आला असून रेकॉर्ड व्यतिरीक्त १०६ महिला व ७०३ बालकांचा शोध घेण्यात आला आहे. तसेच, दिनांक ०१/११/२०२५ ते १५/११/२०२५ या कालावधीत “ऑपरेशन शोध-२” ही विशेष मोहिम राबविण्यात आली असून त्या मोहिमे दरम्यान रेकॉर्डवरील ७०४ बालकांचा शोध घेण्यात आला आहे.

राज्यात महिला व बालकांच्या सुरक्षिततेसाठी निर्भया पथकाची स्थापना करण्यात आली आहे. महिला व मुली यावरील अत्याचारास प्रतिबंध करण्याकरीता पोलीसांची गस्त वाढविणे, पोलीस काका, पोलीस दीदी या उपाययोजना करण्यात येत आहेत. राज्यात सर्व पोलीस ठाणे स्तरावर महिला मदत कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. महिला हेल्पलाईन क्र. १०३, १०९१, ११२ कार्यरत असून त्याव्दारे महिलांना २४ X ७ मदत देण्यात येते. बालकांवरील शाळांमधील अत्याचार रोखण्यासाठी दिनांक १२/०२/२०२६ अन्वये शाळांचे Safety Audit करण्याबाबत निर्देश देण्यात आले आहेत.

स्त्रिया, मुले व नवजात बालके यांच्या तस्करीस प्रतिबंध करण्यासाठी गृह विभाग शासन निर्णय दिनांक २५/०८/२०२१ अन्वये राज्यातील सर्व पोलीस घटकांमध्ये (रेल्वे वगळून) ४५ Anti Human Trafficking Cell स्थापन करण्यात आले आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**महावितरण कंपनीच्या १३ मंडळ कार्यालयांचे खाजगीकरण करण्यात येणार असल्याबाबत**

**(९) * ७१९६ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.अभिजित वंजारी, श्री.राजेश राठोड, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, ॲड.अनिल परब, श्री.संजय खोडके, डॉ.परिणय फुके, श्री.योगेश टिळेकर, श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.इद्रिस नायकवडी, श्री.सतिश चव्हाण, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महावितरण कंपनीच्या १३ मंडळ कार्यालयांचे खाजगीकरण होणार असून सदर कार्यालये खाजगी कंपन्यांच्या ताब्यात जाणार असून यामध्ये जालना, छत्रपती संभाजीनगर शहर व ग्रामीण, नांदेड, परभणी, हिंगोली, वाशिम, अकोला, बुलढाणा, यवतमाळ, सोलापूर, धाराशिव व बीड शहरातील कार्यालयांचा समावेश असल्याचे नुकतेच माहे जानेवारी,२०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर खाजगीकरणास महाराष्ट्र स्टेट इलेक्ट्रिकल वर्कर्स फेडरेशन या संघटनेसह राज्यातील अनेक संघटनांनी तीव्र विरोध केला असून याकरीता झालेल्या संपाच्या पार्श्वभूमीवर झालेल्या बैठकीत महावितरणचे कोणत्याही प्रकारचे खाजगीकरण होणार नाही अशी ग्वाही मा.मुख्यमंत्री महोदयांनी दिली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, महावितरण कंपनी ४७८ कोटी रुपये, महापारेषण १,५०० कोटी रुपये तर महानिर्मिती १०० कोटी रुपयांनी नफ्यात असतानादेखील कंपन्यांचे खाजगीकरण करण्याबाबत शासनाने कार्यवाही केली आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर खाजगीकरणाचा निर्णय उद्योजक, व्यावसायिक आणि शेतकरी यांचेसाठी हितकारक नसल्यामुळे शासनाने सदर निर्णय मागे घेऊन खाजगीकरण न करता महावितरणामध्ये आधुनिक तंत्राचा वापर करून कोणत्या आवश्यक उपाययोजना केल्या वा करण्यात येत आहेत,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

तथापि, "वीज क्षेत्राच्या खाजगीकरणाची प्रक्रिया सुरु; १३ मंडळात फ्रेंचायझी" अशा आशयाचे वृत्त दैनिक अजिंक्य भारत वृत्तपत्रामध्ये दिनांक ०६/०१/२०२६ रोजी प्रसिध्द झाले होते.

(२) महाराष्ट्र राज्य विद्युत कर्मचारी, अभियंते, अधिकारी कृती समितीमधील संघटनांनी दिलेल्या संप नोटिसमधील विविध प्रश्नासंदर्भात दिनांक ०६/१०/२०२५ रोजी शासन व महावितरण स्तरावर कृती समिती मधील संघटनांसोबत बैठका घेण्यात आल्या. सदर बैठकांमध्ये संघटनांसोबत सर्व मुद्यांवर सविस्तर व सकारात्मक चर्चा करण्यात आली. त्यानुसार खाजगीकरण करण्याचे कोणतेही धोरण नसल्याचे स्पष्ट करण्यात आलेले आहे

(३) ऊर्जा विभागाच्या अधिनस्त महावितरण, महापारेषण, महानिर्मिती कंपन्यांच्या खाजगीकरणाचा कोणताही प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन नाही.

(४) महावितरण कंपनीचे खाजगीकरण करण्याचे कोणतेही धोरण नाही परंतु काळानुसार बदल करण्याच्या अनुषंगाने अत्याधुनिक माहिती तंत्रज्ञानाचा वापर करणे, नवीकरणीय ऊर्जा वापरावर भर देणे, जास्तीत जास्त ग्राहक सेवा ऑनलाइन उपलब्ध करणे, वीजेचा वाढता वापर लक्षात घेऊन पायाभूत सुविधांचा मोठ्या प्रमाणावर विकास करणे अशा प्रकारची अनेक कामे महावितरणमध्ये करण्यात येत आहेत.

(५) लागू नाही.

----------------

## राज्यात विदर्भ, मराठवाड्यासह सीमावर्ती भागांमध्ये गांजाची अवैधरित्या लागवड करण्यात येत असल्याबाबत

**(१०) * ७३१० श्री.एकनाथराव खडसे, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.राजेश राठोड, श्री.अभिजित वंजारी, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) बुलढाणा, यवतमाळ, नाशिक, धुळे, सांगली जिल्ह्यामध्ये तसेच मराठवाडा विभागातील काही भागांमध्ये अवैधरित्या गांजाची लागवड मोठ्या प्रमाणावर करण्यात येत असल्याचे तसेच चंद्रपूरसह इतर सीमावर्ती भागांमध्ये हा बेकायदेशीर उद्योग सुनियोजित पध्दतीने वाढविला जात असून, गरीब व अल्पभूधारक शेतकऱ्यांची शेती बटाईने घेऊन आंध्र प्रदेशातील व्यापाऱ्यांकडून गांजाचे उत्पादन व खरेदी केली जात असल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शिरपूर (जि.धुळे) तालुक्यातील जामण्यापाणी, भोरखेडा व बभळाज शिवारातील वनजमिनीवर लागवड केलेला सुमारे २ हजार १२५ किलो गांजाची एकूण किंमत १ कोटी ६ लाख २५ हजार रुपये इतकी असून, दुर्गम भागातून हा मुद्देमाल वाहून नेणे शक्य नसल्याने पोलीस आणि वनविभागाने संयुक्त कारवाई करून जाळून नष्ट केल्याची घटना दिनांक ८ डिसेंबर २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यात स्थानिक पोलीस प्रशासन, वनविभाग, महसूल यंत्रणा व अन्य संबंधित यंत्रणांच्या दुर्लक्षामुळेच शेत जमीन तसेच वन जमिनीवर गांजाची लागवड करण्याचे व तस्करीचे प्रमाण वाढले असून, राज्यातील कायदा-सुव्यवस्थेला आव्हान देणाऱ्या सदर प्रकरणांची सखोल चौकशी करून गांजाच्या अवैध शेतीला आळा घालण्यासाठी तसेच या प्रकरणांतील मुख्य गुन्हेगार, व्यापारी, मध्यस्थ व त्यांना संरक्षण देणारे किंवा दुर्लक्ष करणारे संबंधित अधिकारी/कर्मचारी यांच्यावर अंमली पदार्थ विरोधी कायद्यानुसार (NDPS) कोणती कठोर कारवाई करण्यात आली आहे,

(४) असल्यास, राज्यातील गांजाच्या अवैध शेतीला पूर्णपणे आळा घालण्यासाठी ड्रोन सर्वेक्षण, उपग्रह निरीक्षण, सीमावर्ती राज्यांशी संयुक्त विशेष पथके, व स्वतंत्र राज्यस्तरीय टास्क फोर्स स्थापन करण्याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) माहे डिसेंबर २०२५ मध्ये राज्यातील विशेषतः बुलढाणा, यवतमाळ, नाशिक, धुळे, सांगली तसेच मराठवाडा विभागातील काही भागांमध्ये गांजाची अवैध लागवड करुन उत्पादन घेतले जात असल्याबाबत १० गुन्हे दाखल असून ८ आरोपींना अटक करण्यात आले आहे. त्यामध्ये रुपये २,३८,३५,८३०/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

चंद्रपुर जिल्ह्यात सिमावर्ती भागात गरीब व अल्पभुधारक शेतकऱ्यांची शेती बटाईने घेवून आंधप्रदेशातील व्यापाऱ्यांकडून शेती करण्यात येते; परंतु आजपावेतो आंध्रप्रदेशातील व्यापाऱ्यांकडून गांजाचे उत्पादन व विक्री केल्याबाबत गुन्हे नोंद नाहीत.

(२) जामण्यापाडा, ता.शिरपूर, जि.धुळे शिवारातील वनक्षेत्रात कम्पार्टमेंट नं.१०२० नियतक्षेत्र भोरखेडा येथे सुमारे ४० आर क्षेत्रात अती दुर्गम भागात अज्ञात आरोपीने बेकायदेशीरपणे गांजा पिकाची लागवड

केल्याबाबत शिरपूर तालुका पोलीस ठाणे येथे दिनांक ०६/१२/२०२५ रोजी गु.र.नं.३१२/२०२५ एन.डी.पी.एस. ॲक्ट १९८५ चे कलम ८(c), २०(b)(ii)(c),२२ (c) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर वन जमीन ही अतिदुर्गम भागात असल्याने तेथील गांजा पिकाचे झाडे तोडून जप्त करुन आणणे अशक्य असल्याने पोलीस व वन विभागाने संयुक्तरित्या कारवाई करुन रुपये ४२,४५,०००/- किंमतीचा ८४९ किग्रॅ. गांजा झाडे जागेवरच जाळून नष्ट केली आहे.

तसेच बभळाज, ता.शिरपुर जि.धुळे या गावाचे शिवारात नागेश्वर पाडाचे पुढे अंदाजे १ कि.मी. अंतरावर डोंगरा लगत वनजमिनीवर बेकायदेशीरपणे गांजा पिकाची लागवड केल्याबाबत ६ व्यक्तींवर दिनांक २०/०९/२०२५ रोजी थाळनेर पोलीस ठाणे येथे गु.र.नं. १२७/२०२५ एन. डी. पी. एस. ॲक्ट १९८५ चे कलम २० व २२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात एकूण रुपये ३४,०२,०००/- किंमतीचा ९७२ किलो वजनाचा गांजा सदृश्य अंमली पदार्थाचे मुळासहीत झाडे जप्त करण्यात आली आहेत.

सदर गुन्हयातील आरोपींविरुध्द दिनांक १८/१२/२०२५ मा.जिल्हा सत्र न्यायालय, धुळे येथे दोषारोप पत्र दाखल करण्यात आले आहे.

(३) व (४) अंमली पदार्थ अंतर्गत कारवाई करण्यात आल्यानंतर सदर गुन्हयाचे तपासात Forward and Backward Link चा तपास करण्यात येत आहे. अंमली पदार्थ विरोधी कारवाई अधिक पारदर्शक करणेकरीता पोलीस विभागाकडून No Tolerance भूमिका राबविली जात आहे. त्याकरीता अंमली पदार्थ विषयक गुन्ह्यात दोषी आढळणाऱ्या पोलीस अधिकारी व अंमलदार यांना शासकीय सेवेतून बडतर्फ करण्याच्या सुचना दिनांक २२/०८/२०२५ रोजीच्या परिपत्रकान्वये सर्व पोलीस घटकांना देण्यात आल्या आहेत.

सन २०२२ ते नोव्हेंबर २०२५ पर्यंत अंमली पदार्थ विषयक गुन्ह्यात दोषी आढळणाऱ्या एकूण १० पोलीस अधिकारी व अंमलदार यांचे निलंबन करण्यात आले असून, १५ पोलीस अधिकारी व अंमलदार यांना शासकीय सेवेतून बडतर्फ करण्यात आले आहे.

राज्यात अंमली पदार्थांच्या व्यापारास व प्रसारास आळा घालण्यासाठी दिनांक ३१/०८/२०२३ च्या शासन निर्णयाने अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स (ANTF) ची स्थापना करण्यात आली असून ANTF चे सर्व ७ युनिट्स कार्यान्वित करण्यात आले आहेत.

सन २०२५ मध्ये अंमली पदार्थ विरोधी टास्क फोर्स (ANTF) व पोलीस घटकांमार्फत एकूण रुपये ५२३.१७ कोटी किंमतीचे अंमली पदार्थ नष्ट करण्यात आले आहेत.

राज्यात सन २०२५ मध्ये अंमली पदार्थ ताब्यात बाळगणे/वाहतूक करणे संदर्भात एकूण ३६५९ गुन्हे दाखल झालेले असून ५३०७ आरोपींना अटक करण्यात आलेली आहे व एकूण रुपये १३४०.४१ कोटी किंमतीचे अंमली पदार्थ जप्त करण्यात आलेले आहेत.

सन २०२५ मध्ये राज्यात अंमली पदार्थ विरोधी जनजागृती मोहिम प्रभावीपणे व नियमीतपणे राबविण्यात आली आहे.

अवैध अंमली पदार्थ व्यापारातील संघटीत गुन्हेगारीस आळा घाळण्यासाठी महाराष्ट्र संघटीत गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम,१९९९ मध्ये सन २०२५ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ चे कलम (२)(दोन) अन्वये सुधारणा करण्यात आली आहे. त्यानुसार सदर कायद्या अंतर्गत राज्यात सन

२०२५-२०२६ मध्ये एकूण १० गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

राज्यात PITNDPS Act १९८८ (Prevention of Illicit Traffic in Narcotic Drugs and Psychotropic Substances Act) अंतर्गत सन २०२५ व २०२६ मध्ये एकूण ६ आरोपींना स्थानबध्द करण्यात आले आहे.

तसेच परदेशात राहुन त्यांचे हस्तकांमार्फत भारतामध्ये अंमली पदार्थांचे कारखाने चालवून अंमली पदार्थाची निर्मिती व विक्री करणाऱ्या एकूण ०४ आरोपींना प्रत्यार्पण करुन मुंबई पोलीसांनी अटक केली आहे.

त्याचप्रमाणे सन २०२५ मध्ये राज्यात पोलीस व इतर Drug Law Enforcement Agencies यांनी अंमली पदार्थ बनवणाऱ्या छुप्या ठिकाणांवर/कारखान्यांवर कारवाई (Clandestine Lab Bursting) करुन एकूण १४ गुन्हे दाखल केले आहेत.

(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## माथेरान (जि.रायगड) येथे मूलभूत व पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत

**(११) * ७६४९ श्रीमती चित्रा वाघ, श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर :** सन्माननीय **पर्यटन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) माथेरान (जि.रायगड) या महत्त्वाच्या पर्यटन स्थळांस भेटी देण्यासाठी दरवर्षी हजारो देशी-विदेशी पर्यटक येथे येत असून याठिकाणी रस्त्यांची झालेली दुरवस्था, पार्किंगचा अभाव, ई-रिक्षा व्यवस्थेतील अनियमितत्ता, स्वच्छतागृह व पिण्याच्या पाण्याच्या अपुऱ्या सुविधा यासारख्या मूलभूत व पायाभूत सुविधा उपलब्ध नसल्यामुळे पर्यटकांमध्ये प्रचंड नाराजी पसरली असल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, माथेरान येथील सदर मूलभूत सुविधांच्या व प्रशासकीय नियोजनाच्या अभावामुळे पर्यटन विकासावर विपरीत परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, शासनाने सदर प्रकरणी चौकशी करून माथेरान येथे मूलभूत व पायाभूत सुविधा उपलब्ध करून देण्याबाबत व पर्यटन विकास करण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.शंभूराज देसाई :** (१) व (२) नाही, हे खरे नाही.

(३) प्रादेशिक पर्यटन विकास योजनेतंर्गत माथेरान येथे मूलभूत सुविधा पुरविण्यासाठी पर्यटन विभागामार्फत रुपये ५५१.२९ लक्ष रकमेच्या कामांना प्रशासकीय मान्यता देऊन रू २९४.२८ लक्ष इतका निधी माथेरान गिरिस्थान नगरपरिषद यांना वितरीत करण्यात आला आहे.

तसेच, सदर स्थळाच्या ठिकाणी मूलभूत सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी माथेरान गिरीस्थान नगरपरिषदेच्या आर्थिक तरतुदीनुसार कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## राज्यातील न्यायालयांमधील विवाह समुपदेशकांची रिक्त पदे भरण्याबाबत

**(१२) * ७२०७ श्री.अभिजित वंजारी, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.सुधाकर अडबाले, श्री.धीरज लिंगाडे, श्री.जयंत आसगावकर, श्री.राजेश राठोड :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात विवाहीत जोडप्याची घटस्फोटाची प्रकरणे न्यायालयात प्रलंबित असून, न्यायालयामधील विवाह समुपदेशन करणाऱ्या कर्मचाऱ्यांची पदे मोठ्या प्रमाणात रिक्त असल्याने उक्त घटस्फोटाची प्रकरणे वर्षानुवर्षे निर्णयाकरीता प्रलंबित असल्याने अनेक घटस्फोट घेऊ इच्छिणाऱ्या जोडप्यांना मनस्ताप सहन करावा लागत असल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, घटस्फोट घेणे हा घटनात्मक अधिकार असून याकामी समुपदेशन करणाऱ्या कर्मचाऱ्यांची पदे भरण्यासंदर्भात शासनाची भूमिका उदासिन आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, विवाह समुपदेशक कर्मचाऱ्यांची रिक्त पदे भरुन घटस्फोट घेऊ इच्छिणाऱ्या जोडप्यांना न्याय देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे अंशत: खरे आहे.

(२) व (३) मा.उच्च न्यायालयाकडून कौटुंबिक न्यायालयांच्या आस्थापनांवरील विवाह समुपदेशक या पदासाठी भरती प्रक्रिया राबविण्यात आली असून, दिनांक १०/०२/२०२६ रोजी २५ उमेदवारांची निवड यादी व ६ उमेदवारांची प्रतिक्षा यादी प्रसिध्द करण्यात आली आहे. निवड यादीवरील उमेदवारांना नेमणूक देण्याचे काम सध्या सुरु आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मानवत (जि.परभणी) तालुक्यातील दिव्यांगांना सायकलींचे वाटप करण्याबाबत

**(१३) * ७०७८ श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्री.अमित गोरखे :** सन्माननीय **दिव्यांग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मानवत (जि.परभणी) तालुक्यातील दिव्यांगांसाठी देण्यात आलेल्या सायकलींचे वाटप दिव्यांगांना न करता उक्त सायकली आठवडे बाजारातील भंगाराच्या दुकानात आढळल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दिव्यांग व्यक्तींना उपयुक्त असलेल्या सायकली प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे दिव्यांगाना देण्यात न आल्याने दिव्यांग व्यक्तींकडून नाराजी व्यक्त होत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास परभणी जिल्ह्यातील दिव्यांगांसाठी देण्यात आलेल्या सर्व साहित्यांचा तात्काळ आढावा घेऊन या सायकली दिव्यांग व्यक्तींना देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) हे खरे नाही.

धरती जनसेवा प्रतिष्ठान संचलित औद्योगिक प्रशिक्षण संस्था (ITI) पोहेटाकळी, ता.पाथरी, या खाजगी कायम विनाअनुदानित संस्थेने तीन वर्षापुर्वी औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या विद्यार्थी प्रशिक्षणासाठी (वेल्डींग, दुरुस्ती व नवीन नमुना बनविणे इ.) स्वनिधितुन खरेदी केलेल्या असून त्यासाठी शासनाचे आर्थिक सहाय्य देण्यात आलेले नाही. सद्य:स्थितीत नादुरुस्त व मोडकळीस आलेल्या सदर २२ तीनचाकी सायकली श्री.दयानंद उत्तमराव मगर यांनी श्री.शेख खदीर शेख अमीरोद्दीन रा. मानवत यांचे आठवडी बाजारातील दुकानात दिनांक १० फेब्रुवारी, २०२५ रोजी इतर भंगार सामानासोबत विक्रीसाठी आणल्या होत्या. सदर तीनचाकी सायकली परत नेण्यात आलेल्या आहेत.

(२) हे खरे नाही.

(३) दिव्यांग व्यक्तींना कृत्रिम अवयव व साधने शासनाकडून पुरवण्याची किंवा त्याकरीता अर्थसहाय्य देण्यासाठी राज्य शासनामार्फत "दिव्यांग व्यक्तींना कृत्रिम अवयव व साधने पुरविणे" ही योजना राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत दिव्यांग लाभार्थ्यांना त्यांच्या वैयक्तिक गरजेनुसार कृत्रिम अवयव साधनांचा पुरवठा करण्यात येतो. तसेच, अंधांना टेपरेकॉर्डर व कॅसेट करीता अर्थसहाय्य देण्यात येते.

तसेच महाराष्ट्र राज्याचे दिव्यांग धोरण, २०१८ मध्ये तरतुदीनुसार विविध स्थानिक स्वराज्य संस्था मध्ये दिव्यांगांसाठी राखीव ठेवण्यात येणाऱ्या ५ टक्के निधीमधून दिव्यांगांना सहायक उपकरणे उपलब्ध करुन देण्यात येतात.

तीन चाकी हाताने ओढणाऱ्या सायकलींमुळे दिव्यांग व्यक्तींच्या शरीरस्वास्थ्यावर प्रतिकुल परिणाम होत असल्याने तीन चाकी हाताने ओढणाऱ्या सायकलीचे वाटप होऊ नये याची दक्षता घेण्याबाबत सर्व प्रशासकीय विभाग, त्याअंतर्गत अधिनस्त क्षेत्रिय कार्यालये आणि अन्य शासकीय/ निमशासकीय संस्था यांनी दक्षता घेणेबाबत शासन निर्णय दिनांक २२ सप्टेंबर, २०२५ अन्वये सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार राज्यात तीन चाकी हाताने ओढणाऱ्या सायकलींचे वितरण बंद करण्यात आलेले आहे.

केंद्र शासनाच्या ALIMCO या संस्थेमार्फत दरवर्षी परभणी जिल्ह्यात शिबीरे आयोजित करुन दिव्यांगांच्या मागणीनुसार साहित्य वितरीत करण्याबाबत कार्यवाही करण्यात येत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील दिव्यांगांच्या शासकीय शाळांना अनुदान वितरीत करण्याबाबत

**(१४) * ७५०५ श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.इद्रिस नायकवडी, श्री.सतिश चव्हाण, श्री.संजय खोडके, श्री.शशिकांत शिंदे, श्री.पंकज भुजबळ, श्रीमती उमा खापरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, श्री.अमित गोरखे :** सन्माननीय **दिव्यांग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात दिव्यांगांच्या २० शासकीय शाळांपैकी ३ शाळा बंद झाल्या असून १७ शाळांच्या अनुदानाबाबतचा प्रस्ताव दिव्यांग आयुक्तालयाकडून दिव्यांग कल्याण विभागाकडे पाठविण्यात आला होता, तथापि, सदर प्रस्तावामध्ये अनेक त्रुटी असल्याने उक्त प्रस्ताव पुन्हा दिव्यांग आयुक्तालयास माहे नोव्हेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान पाठविण्यात आला असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू अनुदानाचा प्रस्ताव ४ कोटी ४७ लाख ८१ हजार ५० रुपये एवढा रकमेचा असून दिव्यांग आयुक्तालय, पुणे येथे प्रस्ताव सादर करुनही अनुदान मिळत नसल्यामुळे काही शाळा बंद पडण्याच्या मार्गावर आहेत तर दिव्यांग विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सर्वकष कल्याणासाठी ५५० खासगी अनुदानित निवासी शाळांना गेल्या ५ वर्षांपासून वेतनेत्तर अनुदान मिळाले नसल्याने दिव्यांग विद्यार्थी सोयीसुविधांपासून वंचित राहत आहेत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, दिव्यांगांच्या शासकीय शाळांचे प्रस्ताव वित्तीय वर्ष संपण्यापूर्वी आयुक्तालयाकडून मंत्रालयात मंजूरीसाठी पाठविणे आवश्यक असताना सदरहू प्रस्ताव विहित मुदतीत शासनाकडे सादर केले जात नाहीत, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने सदर प्रकरणाची चौकशी करुन या शासकीय दिव्यांग शाळांना अनुदान देण्याच्या दृष्टीने कोणती कार्यवाही केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
**श्री.अतुल सावे :** (१) अंशत: खरे आहे.

आयुक्त, दिव्यांग कल्याण, पुणे यांनी दिनांक २९ सप्टेंबर, २०२५ रोजीच्या पत्रान्वये सादर केलेल्या प्रस्तावात त्रुटी आढळून आल्याने दिनांक १० ऑक्टोबर, २०२५ रोजीच्या शासन पत्रान्वये त्रुटी पुर्तता करून प्रस्ताव फेरसादर करण्याबाबत कळविण्यात आले होते. तद्नंतर दिनांक १४ डिसेंबर, २०२५ रोजीच्या पत्रान्वये त्रुटी पुर्तता करुन प्रस्ताव सादर करण्यात आला होता.

दिनांक २० जानेवारी, २०२६ रोजीच्या बैठकीत आयुक्त, दिव्यांग कल्याण यांना सर्व शासकीय उपक्रमांच्या वेतनेतर निधी मागणीबाबतचे प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी, संबंधित जिल्हा परिषद यांचेमार्फत आयुक्तालयास सादर करण्याच्या तसेच प्रस्तावांबाबत वेळोवेळी आढावा घेण्याबाबत सूचित केले आहे.

(२) हे खरे नाही.

राज्यामध्ये एकूण २१ शासकीय संस्था मंजूर असून त्यापैकी १७ शासकीय संस्था कार्यरत आहेत. सदर शासकीय संस्थांचे त्रुटी पूर्ततेअभावी अनुदान प्रलंबित आहे.

विभागांतर्गत दिव्यांगत्वाच्या चार प्रमुख प्रवर्गातील ८७० अनुदानित शाळा / कौशल्य विकास केंद्र (कार्यशाळा) यांना मागील ५ वर्षात रुपये ३१६.५३ कोटी इतका निधी वेतनेतर अनुदानासाठी वितरित करण्यात आला आहे.

वेतनेतर अनुदानांतर्गत परिपूर्ण प्रस्तावाआधारे शासकीय/अनुदानित शाळा /कौशल्य विकास केंद्रे यांना परिपोषण, इमारत भाडे आणि एकूण वेतनाच्या ८ टक्के प्रशासकीय खर्च देण्यात येतो.

(३) अंशत: खरे आहे.

शासकीय संस्थांच्या वेतनेत्तर अनुदानाच्या मागणीचे प्रस्ताव दर वर्षी संबंधित जिल्हा कार्यालयांकडून मागविण्यात येतात व मागणीप्रमाणे निधी वितरण करण्यात येते. तसेच दरवर्षी वार्षिक अंदाजपत्रक निधीची मागणी नोंदविली जाते.

(४) दिनांक २० जानेवारी, २०२६ रोजीच्या बैठकीत आयुक्त, दिव्यांग कल्याण यांना सर्व शासकीय उपक्रमांच्या वेतनेतर निधी मागणीबाबतचे प्रस्ताव मुख्य कार्यकारी अधिकारी, संबंधित जिल्हा परिषद यांचेमार्फत आयुक्तालयास सादर करण्याच्या तसेच प्रस्तावांबाबत वेळोवेळी आढावा घेण्याबाबत सूचित केले आहे.

शासकीय संस्थांच्या वेतनेतर अनुदानाच्या प्रस्तावातील त्रुटींची पूर्तता करुन सुधारित प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर निधी वितरणाची कार्यवाही करण्यात येणार आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## शनी शिंगणापूर (जि.अहिल्यानगर) येथील भाविकांना रास्त दरात पूजा साहित्य उपलब्ध करून देण्याबाबत

**(१५)** * **६६७८ श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) शनी शिंगणापूर (जि.अहिल्यानगर) येथे भाविकांना ११०० रुपयांना पूजेच्या ताटाची विक्री केली जात असल्याची बाब शनेश्वर देवस्थानचा प्रशासक असलेले आयुक्त यांनी वेषांतर करून माहे डिसेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आणली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, देवस्थान परिसरात पूजा साहित्याची विक्री मोठ्या दराने करून भाविकांची आर्थिक लूट केली जात असल्याने भाविकांना मोठा मानसिक व आर्थिक त्रास सहन करावा लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, विभागीय आयुक्तांच्या वेषपालट मोहिमेत देवस्थानच्या कामकाजातील हलगर्जीपणा व भाविकांच्या गैरसोयीच्या तक्रारींची पुष्टी झाली असून यामुळे शासनाच्या नियमांचे उल्लंघन होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने संपूर्ण प्रकाराची चौकशी केली आहे काय, सदर चौकशीत काय निष्पन्न झाले आहे व त्याअनुषंगाने पुढे कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) अंशतः खरे आहे,

भाविकांना खाजगी दुकानधारक आणि त्यांचे इतर सहकारी यांचे कडून अवास्तव दरात पूजा साहित्य विक्री होण्याची बाब मा.आयुक्त महोदय व देवस्थान प्रशासन यांचे निदर्शनास आलेली आहे.
(२) अंशतः खरे आहे.

सदरील बाब देवस्थान परिसरात निदर्शनास आलेली नाही, मात्र शिंगणापूर येथील खाजगी व्यक्ती/लटकू आणि दुकानदार/पार्किंग धारक यांच्या बाबत पोलीस विभाग यांचेकडे विविध तक्रारी प्राप्त आहेत.
(३) अंशतः खरे आहे,

विविध प्रकारे भाविकांच्या गैरसोयीची बाब निदर्शनास आलेली आहे. मात्र सदरील बाब ही देवस्थान परीसराबाहेरील असून प्रत्यक्ष देवस्थान कामकाजाशी संबंधित नाही.
(४) सदरील बाबत स्थानिक प्रशासनामार्फत प्रशासक तथा मा.विभागीय आयुक्त नाशिक यांनी दिनांक २७/१२/२०२५ रोजी बैठक घेऊन सर्व दुकानधारक यांनी दरफलक दर्शनी भागात लावण्याबाबत सूचित केले आहे. यासह उपविभागीय अधिकारी तथा दंडाधिकारी यांचे द्वारे (BNSS) १५२ व १५७ अन्वये प्रतिबंधात्मक आदेश पारित करण्यात आलेला आहे.
(५) अशी बाब नाही.

-----------------

## पुण्यातील राजगुरुनगर येथे दहावीच्या शिकवणी वर्गात विद्यार्थ्याची हत्या केल्याबाबत

**(१६) * ६९९५ श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुण्यातील राजगुरुनगर येथे दहावीच्या शिकवणी वर्गात एका विद्यार्थ्याकडून दुसऱ्या विद्यार्थ्याची हत्या करण्यात आल्याची समाजाला अस्वस्थ करणारी घटना दिनांक १५ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यासुमारास घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, शिक्षण ही प्रगती, सुरक्षितता, सकारात्मकता आणि उज्ज्वल भविष्यासाठीची प्रक्रिया मानली जात असताना, अगदी किरकोळ वाद मनात ठेवून एखाद्याचे जीवन संपविण्याचा विचार कोवळ्या वयात केला जात असून शिकवणी वर्गात घडलेली ही हिंसक घटना मुलांच्या बदललेल्या भयावह मानसिकतेचे दर्शन घडवीत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने सदर गंभीर घटनेची दखल घेऊन राज्यातील सर्व खासगी शिकवणी वर्गांची सक्तीची नोंदणी, सुरक्षा मानके, सीसीटीव्ही व्यवस्था, शिक्षकांची पार्श्वभूमी तपासणी व जबाबदारी निश्चित करण्यासाठी स्वतंत्र नियमावली/कायदा लागू करण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे काय, तसेच भविष्यात अशा प्रकारच्या घटनांची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी कोणत्या उपाययोजना करण्यात आल्या आहेत,
(४) असल्यास, सदर गंभीर घटना घडूनही विद्यार्थ्यांच्या मानसिक सुरक्षिततेसाठी व शिकवणी वर्गांवरील नियमनासाठी तसेच अशा घटनांची पुनरावृत्ती पूर्णपणे टाळण्यासाठी शासनाने किती कालमर्यादेत व्यापक व सक्तीच्या धोरणात्मक उपाययोजना राबविल्या आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

सदर प्रकरणी खेड पोलीस स्टेशन येथे गु.र.नं.७१८/२०२५, नुसार दिनांक १५/१२/२०२५ रोजी भा.न्या.सं. कायदा कलम १०३(१) सह ॲट्रॉसीटी कायदा कलम ३(२)(V), ३(१)(r) अन्वये गुन्हा दाखल केला आहे.

सदर गुन्ह्यातील विधीसंघर्षित बालकास दिनांक १५/१२/२०२५ रोजी ताब्यात घेऊन पिठासिन अधिकारी, बाल न्यायमंडळ यांचे समक्ष हजर करण्यात आले असून सद्य:स्थितीत विधीसंघर्षित बालक निरीक्षण गृहामध्ये आहे. सदर गुन्ह्याचा पुढील तपास सुरू आहे.

(२), (३) व (४) शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या दिनांक ०७/०१/२०२६ रोजीच्या शासन निर्णयान्वये राज्यातील शाळांमध्ये तसेच खाजगी शिकवणी वर्गामध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांवर अतिरिक्त ताण तणाव निर्माण होऊ नये याकरीता मार्गदर्शक सूचना निर्गमित केल्या आहेत. तसेच, राज्यातील खाजगी शिकवणी वर्गाची नोंदणी व विनियमन करण्याकरीता खाजगी शिकवणी नोंदणी व विनियमन अधिनियम तयार करण्याची कार्यवाही शासनस्तरावर सुरू आहे.

तसेच, अशा प्रकारच्या घटना घडू नयेत यासाठी पोलीसांमार्फत पुढीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येत आहेत:- १) पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी शाळा व महाविद्यालय यांना भेटी देऊन मुलांचे समुपदेशन करण्यात येते.

२) निर्भया पथका मार्फत शाळा/महाविद्यालय तसेच शिकवणी वर्गात जाऊन तेथील विद्यार्थ्यांचे समुपदेशन करण्यात येते.

३) एनएसएस व एनसीसी विद्यार्थ्यांच्या कॅम्प ला भेटी देऊन समुपदेशन करण्यात येते.
४) महिला व दक्षता कमिटीच्या मार्फत विद्यार्थ्यांचे समुपदेशन करण्यात येते.
५) शाळा, महाविद्यालयामध्ये पालक सभेचे वेळी पालकांचे मार्गदर्शन करण्यात येते.
६) शिकवणी वर्ग, शाळा, महाविद्यालय येथे सी. सी. टी. व्ही. कॅमेरे बसविण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## बुलढाणा जिल्ह्यातील लोणार सरोवरातील पाण्याचे प्रदूषण होत असल्याबाबत

**(१७) * ६७१९ डॉ.परिणय फुके, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) जगप्रसिध्द लोणार सरोवराची (जि.बुलढाणा) जलपातळी सातत्याने पडणाऱ्या मुसळधार पावसामुळे ७ ते ९ मीटरने वाढून काठावरील प्राचीन १० मंदिरांपैकी ८ मंदिरे पूर्णपणे पाण्याखाली गेल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, गेल्या १०० वर्षांत प्रथमच पाणीपातळी इतक्या मोठ्या प्रमाणात वाढल्याने ऐतिहासिक वारसा असलेल्या कमळादेवी मंदिरासह इतर मंदिरांच्या गाभाऱ्यात पाणी शिरून त्यांचे अस्तित्व धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, मुसळधार पावसासोबतच लोणार शहराचे सांडपाणी प्रक्रिया न करता थेट सरोवरात सोडले जात असल्याने जलपातळीत झपाट्याने वाढ होत असून, यामुळे सरोवरातील पाण्याचा सामू (pH) १०.५ वरून ८ पर्यंत खाली येऊन सरोवराच्या अद्वितीय रासायनिक गुणधर्मात बदल होत असून, लोणार हे जागतिक वारसा स्थळ असूनही सांडपाणी सोडल्याने प्रदूषणात वाढ होत आहे तसेच तेथील प्राचीन मंदिरांचे संरक्षण करण्यासाठी कार्यवाही केली जात नसल्याने ऐतिहासिक वास्तू संरक्षण नियमांचे उल्लंघन होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, शासनाने सदर संपूर्ण प्रकाराची चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्याअनुषंगाने सरोवरातील वाढलेली जलपातळी नियंत्रित करण्यासाठी, सांडपाणी रोखण्यासाठी व बुडालेली मंदिरे सुरक्षित करण्यासाठी कोणती कार्यवाही व उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे आहे.
(२) विभागीय वन अधिकारी (वन्यजीव) अकोला यांच्या दिनांक १०/०२/२०२६ रोजीचे अहवालानुसार भारतीय पुरातत्व विभाग यांच्या अखत्यारीतील असलेले कंळमजा माता मंदीर व इतर सरोवरातील मंदिराच्या गाभाऱ्यात पाणी शिरले आहे.
(३) हे खरे नाही.

विभागीय वन अधिकारी (वन्यजीव) अकोला यांच्या दिनांक १०/०२/२०२६ रोजीच्या अहवालानुसार लोणार शहरातील कोणतेही सांडपाणी सरोवरात जात नाही. गोमुख, रामगया व पापहरेश्वर या ठिकाणावरुन सरोवरात गोडेपाणी वाहत येत असून त्याचे (pH) कमी आहे. त्यामुळे सरोवरातील

पाण्याचे (pH) ९.५ ते १०.५ पर्यंत आढळुन येत आहे. सरोवरातील असलेली प्राचिन मंदीरे हे भारतीय पुरातत्व विभाग यांच्या अधिपत्याखाली येत असून मंदिर विकासाची कामे त्यांच्याकडून केली जातात.

जिल्हाधिकारी, बुलढाणा यांच्या दिनांक १३/०२/२०२६ रोजीच्या अहवालानुसार व नगरपरिषद लोणार यांच्या दिनांक १०/०२/२०२६ रोजीच्या अहवालानुसार लोणार शहरातील कोणतेही सांडपाणी सरोवरात जात नाही.

(४) नगरपरिषद, लोणार यांचे दिनांक १०/०२/२०२६ रोजीचे अहवालानुसार, नगरपरिषदेला लोणार सरोवर विकास आराखडा अंतर्गत नविन सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प व भुयारी गटार योजना राबविण्यासाठी शासनाकडून अनुक्रमे दोन टप्प्यात रुपये ६८.८५ कोटी व रुपये ३७.८४ कोटी मंजूर झालेले असून काम प्रगतीपथावर आहे. त्यातील पहिल्या टप्प्यातील काम ८५ टक्के पूर्ण असून दुसऱ्या टप्यातील काम २५ टक्के झालेले आहे.

विभागीय वन अधिकारी (वन्यजीव) अकोला यांच्या दिनांक १०/०२/२०२६ रोजीच्या अहवालानुसार उच्च व तंत्र शिक्षण विभागाचा शासन निर्णय दिनांक ११ जानेवारी, २०२४ अन्वये लोणार सरोवराचे जतन, संवर्धन व विकास करण्याकरीता मा.कुलगुरू संत गाडगे बाबा, अमरावती विद्यापिठ, अमरावती यांच्या अध्यक्षतेखाली वैज्ञानिक सल्लागार मंडळाची स्थापना करण्यात आली आहे. दिनांक २०/०९/२०२५ व दिनांक ०४/१२/२०२५ रोजी आय.आय.टी. मुंबई आणी जी.एस.डी.ए. विभाग, बुलढाणा यांच्याकडून प्रत्यक्ष संयुक्त पाहणी करण्यात आली असून परिसरातून पाण्याचा पाझर सरोवरात होत आहे किंवा नाही याबाबत हायड्रो जीओफीजीकल सर्वे करण्याबाबत आय.आय.टी. मुंबई या संस्थेकडून संशोधन व अध्ययन करण्यात येत आहे.

जिल्हाधिकारी, बुलढाणा यांच्या दिनांक १३/०२/२०२६ रोजीच्या अहवालानुसार सरोवरात झऱ्याचे जाणारे गोडपाणी पंपाव्दारे उपसण्याकरीता लोणार नगरपरिषद व्दारे रुपये ४१.०९ लक्ष ची प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. त्यानुसार काम करण्यासाठी वन्यजीव अधिनियम १९७२ नुसार नाहरकत प्रमाणपत्र देण्याची विनंती जिल्हा प्रशासन व नगरपरिषद लोणार यांनी विभागीय वन अधिकारी (वन्यजीव) अकोला यांचेमार्फत वनसंरक्षक आणी क्षेत्र संचालक, मेळघाट व्याघ्र प्रकल्प, अमरावती यांना केली आहे. तसेच लोणार सरोवराच्या विविध बाबींवर अध्ययन व संशोधन करण्याकरीता आय.आय.टी मुंबई या संस्थेस जिल्हानियोजन समितीमधुन रुपये ४९.५० लक्ष निधी वितरीत केला असून संशोधनाची कार्यवाही सुरू आहे.

(५) प्रश्न उदभवत नाही.

-----------------

## जिल्हाधिकारी रायगड यांनी अरिष्ट निवारण समुहाच्या मासिक सभा नियमितपणे घेण्याबाबत

**(१८) * ७६१० श्री.विक्रांत पाटील :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पनवेल परिसरातील नागरिकांमध्ये रसायन गळतीमुळे व उग्र वासामुळे श्वसनाचे विकार वाढले असून तळोजा, रसायनी इत्यादी औद्योगिक क्षेत्रात घातक व विषारी रसायनांचे उत्पादन, साठवण, वाहतूक इत्यादींमुळे वातावरण प्रदूषित होत असून पर्यावरणाचा ऱ्हास टाळण्यासाठी पनवेल महानगरपालिकेचे तत्कालीन उपमहापौर यांनी तत्कालीन जिल्हाधिकारी, रायगड यांना पर्यावरण (संरक्षण) कायदा, १९८६

अंतर्गत नियमावलीनुसार अरिष्ट निवारण समुहाच्या मासिक सभा नियमितपणे घेण्याबाबत दिनांक २० जानेवारी, २०२२ रोजी पत्राद्वारे विनंती केली असल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जिल्हाधिकारी, रायगड यांनी दिनांक २० जानेवारी, २०२२ ते १५ जानेवारी, २०२६ अखेरपर्यंत अशा स्वरूपाच्या किती बैठका आयोजित केल्या तसेच सदर बैठकीना एम.आय.डी.सी.तील विविध रासायनिक उत्पादन करणारे उद्योजक, नागरिक, लोकप्रतिनिधी, नगरसेवक, आमदार, खासदार इत्यादींना बोलावून त्यांच्या लेखी सूचनेनुसार नागरिकांचे स्वास्थ्य सुरक्षित राहण्याकरीता तसेच पर्यावरणाचे संरक्षण करण्याकरीता कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

(२) दिनांक २० जानेवारी, २०२२ ते १५ जानेवारी, २०२६ या कालावधीत जिल्हा अरिष्ठ समुहाच्या एकूण ४ बैठका घेण्यात आल्या आहेत. सदर बैठकामध्ये रासायनिक, अपघात (आपत्कालीन योजना, तयारी आणि प्रतिसाद) नियम, १९९६ मधील मार्गदर्शक सूचनांनुसार कारवाई करण्याबाबत संबंधित औद्योगिक कारखान्यांना निर्देश देण्यात येतात. सदर बैठकीमध्ये रासायनिक पदार्थांची हाताळणी व वाहतूक करतेवेळी अपघात टाळणेचे प्रशिक्षण देणे, आपत्ती व्यवस्थापन आराखडा तयार करणे, मॉकड्रील घेणे, इ. बाबींचे प्रशिक्षण व आढावा घेतला जातो.

(३) प्रश्न उदभत नाही.

-----------------

## हिंगोली जिल्ह्यातील शेतकऱ्यांना कृषी पंपासाठी दिवसा वीज पुरवठा करण्याबाबत

**(१९) * ६७८७ श्री.हेमंत पाटील, श्री.कृपाल तुमाने, श्री.पंकज भुजबळ, श्री.इद्रिस नायकवडी :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यातील शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा करण्याची घोषणा करूनही हिंगोली जिल्ह्यातील शेतकऱ्यांना अद्यापपर्यंत दिवसा वीज पुरवठा करण्यात येत नसल्यामुळे रब्बी हंगामातील पिकांना पाणी देण्याकरीता शेतकऱ्यांना रात्री शेतात जावे लागत असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, हिंगोली जिल्ह्यात बिबट्याचा संचार असल्याने तसेच रात्रीच्या अंधारात साप, विंचू या सरपटणाऱ्या प्राण्यांचा व रानडुक्करांचा धोका अधिक असताना दिवसा शेतात राबणाऱ्या शेतकऱ्यांना जीव मुठीत घेऊन पिकांना रात्रपाळीत सिंचन करावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्यातील शेतकऱ्यांना रात्री शेतातील पिकांना पाणी देताना वीज पुरवठा खंडीत झाल्यास लवकर सुरळीत न होणे, रोहित्रात बिघाड झाल्यास अथवा फ्युज गेल्यास दुरुस्ती करताना विजेचा धक्का बसून जीवाला धोका निर्माण होणे इत्यादी सह अनेक अडचणींचा सामना करावा लागत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने राज्यातील विशेषत: हिंगोली जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या पिकांना पाणी देण्यासाठी दिवसा वीज पुरवठा करण्याबाबत विशेषत्वाने दखल घेऊन योग्य त्या उपाययोजना करण्याच्या अनुषंगाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२) हे अंशतः खरे आहे,

हिंगोली जिल्ह्यामध्ये शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेंतर्गत व ज्या कृषी वाहिन्यांवर दिवसा वीज पुरवठा करणे तांत्रिकदृष्ट्या शक्य आहे अश्या एकूण १७ उपकेंद्रांमध्ये ३६ कृषी वाहिन्यांवरील सुमारे १९,०८१ कृषी ग्राहकांना दिवसा ८ तास वीज पुरवठा करण्यात येत आहे. उर्वरित उपकेंद्रामध्ये तांत्रिक दृष्ट्या शक्य नसल्याकारणाने या उपकेंद्रांमधून निघणाऱ्या कृषी वाहिन्यांवर मा.वीज नियामक आयोगाच्या निर्देशानुसार दिवसा ८ तास किंवा रात्री ८ तास वीज पुरवठा चक्राकार पध्दतीने करण्यात येत आहे.

(३) हे खरे नाही.

(४) राज्यातील शेतकऱ्यांना कृषी पंपासाठी दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी राज्यात मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना राबविण्यात येत आहे. या योजनेंतर्गत हिंगोली जिल्ह्यामध्ये ६३ उपकेंद्रामधील एकूण ३४१ मे.वॅ. च्या सौर ऊर्जा प्रकल्पांचा समावेश आहे. सदर क्षमता कार्यान्वित झाल्यानंतर २३३ कृषी वाहिन्यांवरील एकूण ७६३१४ कृषी ग्राहकांना दिवसा वीज पुरवठ्याचा लाभ होणार आहे. तसेच, "प्रधानमंत्री कुसुम योजना व "मागेल त्याला सौर ऊर्जा पंप योजना" अंतर्गत सौर पंपाची मांडणी करून शेतकऱ्यांना शेती पंपासाठी दिवसा वीज पुरवठा करण्याचे काम सुरु आहे.

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना-२.० टप्पा-१ अंतर्गत हिंगोली जिल्ह्यातील ३३/११ केव्ही क्षमतेच्या ६ उपकेंद्रांमध्ये पॉवर ट्रान्सफॉर्मरची ५ एमव्हीए ते १० एमव्हीए इतकी क्षमता वाढ करण्यात आलेली आहे. तसेच, ३३/११ के.व्ही. क्षमतेच्या ५ उपकेंद्रांमध्ये प्रत्येकी ५ एमव्हीए क्षमतेचे अतिरीक्त पॉवर ट्रान्सफॉर्मर कार्यान्वित करण्यात आलेले आहेत. तसेच, मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना-२.० अंतर्गत हिंगोली जिल्ह्यातर्गत ३३/११ के.व्ही क्षमतेच्या १९ उपकेंद्रांमध्ये ५ एमव्हीए क्षमतेचे अतिरिक्त पॉवर ट्रान्सफॉर्मर स्थापित करण्यासाठी मंजुरी मिळालेली असून, यापैकी ४ उपकेंद्रातील कामे पूर्ण झालेली आहेत. तसेच, अतिभारीत ३३ के. व्ही. व ११ के.व्ही. विद्युत वाहिन्यांची विलगीकरण करण्यासंबंधीची कार्यवाही सुरु आहे.

शेतकऱ्यांना भविष्यातील वाढीव वीज भार पुर्ततेसाठी विद्युत्त यंत्रणा सक्षमीकरणासाठी नवीन ५ उपकेंद्र, अतिभारीत असलेल्या ५ उपकेंद्रावर ५ एमव्हीए क्षमतेचे अतिरिक्त पॉवर ट्रान्सफॉर्मर आणि १ उपकेंद्रातील पॉवर ट्रान्सफॉर्मरची क्षमता वाढविण्यासाठी (Asian Development Bank (ADB) Scheme अंतर्गत निविदा प्रक्रिया पूर्ण झाली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आर्वी (जि.वर्धा) येथील इंदिरा चौक येथे दोन वृद्ध शेतकऱ्यांची हत्या केल्याबाबत

**(२०)** * **७९६६ श्री.दादाराव केचे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आर्वी (जि.वर्धा) येथील इंदिरा चौक येथे भरदिवसा एका माथेफिरू युवकाने दोन वृध्द शेतकऱ्यांची हत्या व एका लहान मुलाला जखमी केल्याची धक्कादायक घटना दिनांक २१ जानेवारी, २०२६ रोजी वा त्यादरम्यान घडली असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, स्थानिक नागरिकांनी पोलिसांना सतत सूचना देऊन सुद्धा घटनास्थळी पोलीस दाखल झाले नसल्याने स्थानिक नागरिकांनी आपला जीव धोक्यात घालून माथेफिरू युवक आरोपीला पकडून पोलिसांच्या स्वाधीन केले असताना स्थानिक पोलीस निरीक्षक, पोलीस उपविभागीय अधिकारी, आर्वी हे आरोपीला पाठीशी घालत असल्याचे निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरहू माथेफिरू युवक ड्रग्स सेवनाचा व्यसनाधीन असण्याची शक्यता असल्याने सदर प्रकरणाची सखोल चौकशी करून आर्वी पोलीस स्टेशनच्या हद्दीत घडलेल्या गंभीर घटनेबाबत तसेच आरोपीला पाठीशी घालणाऱ्या पोलीस उपविभागीय अधिकारी व पोलीस निरीक्षक यांच्यावर शासनाने कोणती कारवाई केली आहे वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.

सदर प्रकरणी आर्वी पोलीस स्टेशन, वर्धा येथे दिनांक २१/०१/२०२६ रोजी भारतीय न्याय संहिता कलम १०३(१) अन्वये अप.क्रं. ४८/२०२६ नोंदविण्यात आला आहे.

सदर घटनेत दोन वृद्धांचा मृत्यू झाला असून लहान मुलाला किरकोळ स्वरुपाची दुखापत झाली आहे.
(२) व (३) दिनांक २१/०१/२०२६ रोजी सकाळी १०.०८ वा. सदर घटनेबाबत माहिती प्राप्त होताच पोलीस १०.२० वाजता घटनास्थळी पोहचले.

सदर गुन्ह्यातील आरोपी सन २०२३ पासून मानसिक रुग्ण असल्याचे जिल्हा शल्यचिकित्सक, वर्धा यांच्या दिनांक २१/०१/२०२६ रोजीच्या अहवालावरुन दिसून येते. तसेच दिनांक २२/०१/२०२६ रोजी आरोपीस मा.न्यायालयाच्या आदेशान्वये प्रादेशिक मनोरुग्णालय पागलखाना चौक, नागपूर येथे उपचारा करीता दाखल करण्यात आले असून त्यावर उपचार सुरु आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मुंबईत अवैधरित्या व बनावट कागदपत्रे तयार करून वास्तव्य करणाऱ्या बांगलादेशी नागरिकांना परत पाठविण्याबाबत

**(२१) * ८०३९ श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.संजय केणेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मुंबई शहरात बेकायदेशीररीत्या वास्तव्य करणाऱ्या परदेशी नागरिकांना, विशेषतः बांगलादेशी नागरिकांना, अटक करून त्यांना त्यांच्या मूळ देशात परत पाठविण्याची कारवाई सातत्याने करण्यात येत असताना, पूर्वी हद्दपार करण्यात आलेल्या काही बांगलादेशी महिला पुन्हा बेकायदेशीर मार्गाने भारतात प्रवेश करून मुंबई शहरात वास्तव्यास आल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये आग्रीपाडा पोलिसांनी पकडलेल्या दोन बांगलादेशी महिलांना पश्चिम बंगाल सीमेवरून अधिकृत प्रक्रियेद्वारे बांगलादेशात परत पाठविण्यात आले होते, तथापि, त्यांनी पुन्हा अवैधरित्या भारतात प्रवेश करून मुंबईत वास्तव्य केल्याचे तसेच अशा नागरिकांना आधारकार्ड, मतदान ओळखपत्र, पॅनकार्ड, भाडेकरार, जन्मनोंद इत्यादी बनावट कागदपत्रे तयार करून देणाऱ्या व्यक्ती,

एजंट किंवा संघटित टोळ्यांविरुध्द शासनाने कोणती दंडात्मक व फौजदारी कारवाई केली आहे, हे खरे आहे काय,
(३) असल्यास, अवैधरित्या व बनावट कागदपत्रे तयार करून पुन्हा अशा घटना घडू नयेत यासाठी मुंबईत प्रवेश करणाऱ्या बांगलादेशी नागरिकांना परत पाठविण्याबाबत तसेच त्यांना बनावट कागदपत्रे तयार करून देणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.
(२) व (३) माहे ऑगस्ट, २०२५ मध्ये आग्रीपाडा पोलीस ठाणेकडून हद्दपार करण्यात आलेली ०१ घुसखोर बांगलादेशी महिला पुन्हा भारतात घुसखोरीच्या मार्गाने परत येवून कुलाबा परिसरात वास्तव्य करीत असताना आढळून आल्याने तिच्याविरुध्द दिनांक ०५/०१/२०२६ रोजी वि.स्था.ख.क्र.०५/२०२६ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे.

बृहन्मुंबई शहरात घुसखोर बांगलादेशी नागरिकांना ताब्यात घेवून त्यांना हद्दपार करण्याची कार्यवाही नियमितपणे चालू आहे. घुसखोर बांगलादेशी नागरिकांकडे असणाऱ्या कागदपत्रांची पडताळणी करुन ते बनावट असल्यास प्रचलित कायद्यान्वये कारवाई करण्यात येते. तसेच हद्दपार केलेल्या घुसखोर बांगलादेशी नागरिकांकडे मिळून आलेली कागदपत्रे रद्द करण्याबाबत, ते जारी केलेल्या यंत्रणेला पत्रव्यवहार करण्यात येतो.

तसेच बांगलादेशी नागरिकांच्या घुसखोरीवर नियंत्रण ठेवण्यासाठी करावयाच्या कार्यवाहीसंदर्भात सर्वसमावेशक सूचना विविध विभागांना दिनांक २७/०६/२०२५ रोजी दिलेल्या आहेत.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वरखेडी तांडा, फर्दापुर तांडा (ता.सोयगाव जि.छत्रपती संभाजीनगर) व इतर लगतच्या बंजारा समाजाच्या तांड्यातील शेतकऱ्यांच्या जमिनी गैरप्रकारे अधिग्रहीत केल्याबाबत

**(२२) * ८०६८ श्री.राजेश राठोड, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.धीरज लिंगाडे, श्री.सुधाकर अडबाले :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) वरखेडी तांडा, फर्दापूर तांडा (ता.सोयगाव, जि.छत्रपती संभाजीनगर) तसेच परिसरातील इतर बंजारा समाजाच्या तांड्यांमधील अल्पभूधारक व आर्थिकदृष्ट्या दुर्बल शेतकऱ्यांच्या जमिनी अवादा ग्रीन प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीमार्फत सौरऊर्जा प्रकल्प उभारणीसाठी खरेदी अथवा कराराद्वारे अधिग्रहीत करण्यात आल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आलेली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर जमिनींपैकी काही जमिनी कायमस्वरूपी अल्प दरात खरेदी करण्यात आल्या असून काही जमिनी दीर्घकालीन कराराद्वारे अधिग्रहित केल्याने त्यावर अवलंबून असलेल्या स्थानिक शेतकरी कुटुंबांची उपजिविका धोक्यात आली असून अनेक कुटुंबांना उदरनिर्वाहसाठी मुला-बाळांसहीत ऊसतोड मजुरीसाठी स्थलांतर करावे लागत असल्याची बाब निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, तांडे दत्तक घेण्याच्या नावाखाली स्थानिक शेतकऱ्यांना विविध मूलभूत सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्याचे आश्वासन कंपनीमार्फत देण्यात आले असून अद्याप त्याची पूर्तता न झाल्याने शेतकऱ्यांची फसवणूक झाल्याबाबत अनेक तक्रारी प्राप्त झाल्या असून शासनाने सदर प्रकरणाची चौकशी करून संबंधित कंपनीविरुध्द कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेंतर्गत जालना जिल्ह्यामध्ये सौर ऊर्जा प्रकल्प उभारणी साठी मे. अवादा ग्रीन प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीला कोणताही कार्यादेश देण्यात आलेला नाही.

मौ. फर्दापूर तांडा व वरखेडी तांडा ही गावे ता.सोयगाव जि.छत्रपती संभाजीनगर मध्ये येत असून सदर ठिकाणी मे. अवादा एम एच ग्रीन प्रायव्हेट लिमिटेड या कंपनी मार्फत १०० MW क्षमतेचा खाजगी सौर प्रकल्प कार्यान्वित करण्यात आलेला आहे. सदर प्रकल्प खाजगी मालकीचा असल्यामुळे महावितरण कंपनी मार्फत सदर ठिकाणी कोणत्याही प्रकारचे जमीन अधिग्रहण (किंवा भाडेपट्टी करार) करण्यात आलेले नाहीत.
(२), (३) व (४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## केशवनगर-मुंढवा (जि.पुणे) येथील आरएमसी प्लांटमुळे प्रदूषणात वाढ झाल्याबाबत

**(२३)** * **७०३३ श्री.योगेश टिळेकर :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) पुणे शहरातील केशवनगर-मुंढव्यात नियमांचे पालन न करणाऱ्या आरएमसी प्लांटच्या उडणाऱ्या धुळीमुळे प्रदूषणात भर पडत असल्याने नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला असून प्रशासनाने तातडीने कठोर कारवाई करण्याची मागणी पर्यावरणप्रेमींकडून केली असल्याची बाब माहे डिसेंबर,२०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्लांट वस्त्या व सोसायट्यांच्या जवळ असल्याने परिसरातील नागरिकांना धुळीचा आणि आवाजाचा त्रास सहन करावा लागत असून, त्यामुळे नागरिकांना सर्दी, खोकला, दमा अशा आजारांना सामोरे जावे लागत असून त्यामुळे नागरिकांचे आरोग्य धोक्यात आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, शासनाने सदर बाबीची सखोल चौकशी करून आरएमसी प्लांटमधून निघणारे प्रदूषण रोखण्यासाठी प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नवीन नियमांचे पालन न करणाऱ्या प्लांट चालकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे अंशत: खरे आहे.
(२) आरोग्य विभाग, पुणे महानगरपालिका, यांचेकडून प्राप्त अहवालानुसार प्रश्नाधिन परिसरात मागील तीन महिन्यात सर्दी, खोकला, दमा अशा आजारांच्या रूग्णांच्या प्राप्त आकडेवारीवरून आरोग्यविषयक गंभीर समस्या उद्भवल्याचे दिसून येत नाही.

(३) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने प्रश्नाधिन परिसरातील आरएमसी प्लांटची पाहणी करून पाहणी दरम्यान आढळलेल्या त्रुटींच्या अनुषंगाने (१) मे.बीटॉन इंडस्ट्रीज प्रा. लि. व मे. आरव्हीके रेडीमिक्स काँक्रीट या आरएमसी उद्योगांना दिनांक ३०/१२/२०२५ रोजी प्रस्तावित आदेश दिले आहेत.(२) मे.ग्लोबल इन्फ्रा या उद्योगास दिनांक ०६/०५/२०२४ रोजी बंदचे आदेश दिले आहेत.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मुंबई - पुणे द्रुतगती मार्गावरील वाहनचालकांकडून ई-चलानच्या कोट्यवधी रुपयांच्या थकीत रकमेची वसुली करण्याबाबत

**(२४) * ६६६० श्री.मिलिंद नार्वेकर :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर होणारे अपघात कमी करण्यासाठी परिवहन विभागाने इंटेलिजंट ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टीम (आयटीएमएस) कार्यान्वित केली असून, गेल्या दीड वर्षात द्रुतगती मार्गावर आयटीएमएसच्या मदतीने वाहतूकीचे नियम मोडणाऱ्या ३६ लाख वाहनचालकांवर ई-चलानच्या माध्यमातून ५९९ कोटी रुपयांचा दंड आकारण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सद्य:स्थितीत जवळपास ८५ टक्के वाहनचालकांनी ई-चलान दंडाची रक्कम भरलेली नसल्याचे वास्तव माहे जानेवारी,२०२६ मध्ये निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले असून मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर वाहतूक नियम मोडणाऱ्या वाहनचालकांकडून ई-चलानची कोट्यवधी रुपयांची थकीत रक्कम तातडीने वसूल करण्याबाबत शासनाकडून कोणती ठोस कार्यवाही करण्यात आली आहे वा करण्यात येत आहेत,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक :** (१) व (२) होय.

(३) केंद्र शासन अधिसूचना दिनांक २०/०१/२०२६ अन्वये चलनाबाबत मार्गदर्शक सूचना प्रसिध्द करण्यात आल्या आहेत.वाहनधारकांना थकीत असलेली चलान भरणा करण्यासाठी ई-नोटीस पाठविण्यासाठी बल्क एसएमएस (Bulk Sms) प्रणाली सुरु केली आहे. सदर प्रणालीद्वारे वाहनधारकांना त्यांच्या मोबाईलवर लघु संदेश (Text Sms) द्वारे चलान भरणा करण्याबाबत ई-नोटीस पाठविण्यात येते. एकाच वाहनावर अनेक चलने असल्यास वाहनधारकांवर मोटार वाहन न्यायालयात खटले दाखल करण्यात येतात. प्रलंबित चलान वसुलीबाबत कार्यवाही करण्याच्या अनुषंगाने क्षेत्रिय कार्यालयांना सूचित करण्यात आले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## अहिल्यानगर जिल्हा परिषदेने दिव्यांग कर्मचाऱ्यांच्या प्रमाणपत्रांचा तपासणी अहवाल पाठविला नसल्याबाबत

**(२५) * ७३४५ श्री.श्रीकांत भारतीय, श्री.अमित गोरखे, श्रीमती उमा खापरे, श्री.सदाशिव खोत, श्रीमती चित्रा वाघ, श्री.संजय केणेकर :** सन्माननीय **दिव्यांग कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिव्यांग कल्याण विभागाने दिनांक १८ सप्टेंबर, २०२५ रोजी राज्य शासनाच्या नोकरीत कार्यरत असलेल्या सर्व दिव्यांग कर्मचाऱ्यांच्या दिव्यांगत्वाची व त्यांच्या प्रमाणपत्रांची तीन महिन्यांच्या आत पडताळणी करून, कर्मचारी संशयास्पद आढळल्यास त्यांच्या प्रमाणपत्रांची फेरतपासणी करण्याबाबतचा शासन आदेश निर्गमित केला असून, त्यानुसार सर्व जिल्ह्यांमधील शासकीय विभागांमध्ये सदर आदेशाची अंमलबजावणी सुरु करण्यात आल्याचे माहे जानेवारी,२०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, अहिल्यानगर जिल्हा परिषदेने दिनांक १९ ते २१ नोव्हेंबर,२०२५ दरम्यान तालुकानिहाय शिबिर घेऊन शेकडो दिव्यांग कर्मचाऱ्यांची प्राथमिक तपासणी केली असून त्यातील काही दिव्यांग कर्मचाऱ्यांना तपासणी करीता जिल्हा रुग्णालय व नाशिक उपसंचालक कार्यालयाकडे पाठविण्याचा निर्णय घेण्यात आला, त्यास अनेक महिन्यांचा कालावधी होऊनही अद्यापपर्यंत या कर्मचाऱ्यांची तपासणी झालेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दिव्यांग कल्याण विभागाच्या आदेशानुसार राज्यातील जिल्ह्यांनिहाय किती दिव्यांग कर्मचाऱ्यांच्या दिव्यांगत्वाची प्रमाणपत्रे खोटी किंवा ४० टक्क्यांपेक्षा कमी अपंगत्व असलेली आढळून आली आहेत,

(४) असल्यास, दिव्यांग कल्याण विभागाच्या आदेशानुसार अहिल्यानगर जिल्ह्यासह राज्यातील सर्व जिल्ह्यांतील दिव्यांग कर्मचाऱ्यांचा तपासणी अहवाल शासनास प्राप्त झाला आहे काय, तसेच सदर अहवालाच्या अनुषंगाने शासनाने दोषी दिव्यांग कर्मचाऱ्यांवर तसेच त्यांना प्रमाणपत्र देणाऱ्या तत्कालीन अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अतुल सावे :** (१) होय, खरे आहे.

(२) नाही,

अहिल्यानगर जिल्हा परिषदेव्दारे एकूण ५४५ दिव्यांग अधिकारी / कर्मचारी यांची तालुकास्तरीय दिव्यांग समितीमार्फत पडताळणी करण्यात आली. सदर तपासणीमध्ये एकूण २२९ अधिकारी / कर्मचाऱ्यांचे दिव्यांगत्व प्रमाणपत्र वैध असल्याचे आढळून आले आहे. १ कर्मचाऱ्याचे दिव्यांगत्वाचे प्रमाण लाक्षणिक (४० टक्के) दिव्यांगत्वापेक्षा कमी असल्याचे आढळून आले असून उर्वरित २४० अधिकारी /कर्मचाऱ्यांची पडताळणी जिल्हा शल्य चिकीत्सक व उपसंचालक, नाशिक यांचेमार्फत करण्याबाबत प्रस्तावित करण्यात आलेले आहे. ७६ कर्मचाऱ्यांच्या पडताळणीस मा.न्यायालयाकडून स्थगिती देण्यात आलेली आहे.

(३) व (४) संशयास्पद दिव्यांग प्रमाणपत्रांच्या आधारे शासकीय नोकरी मिळविणाऱ्या अधिकारी / कर्मचारी यांच्या दिव्यांगत्वाची पडताळणी करुन अवैध / बनावट दिव्यांग प्रमाणपत्र धारक अधिकारी कर्मचाऱ्यांवर दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, २०१६ नुसार कार्यवाही करणेबाबत शासन निर्णय दिनांक ९ ऑक्टोबर, २०२५ अन्वये सुचना देण्यात आलेल्या आहेत. त्यास अनुसरुन जिल्हा परिषदांतर्गत कार्यरत दिव्यांग कर्मचाऱ्यांची पडताळणी करुन त्याबाबत २८ जिल्हा परिषदांचा अंतरीम अहवाल शासनास प्राप्त झालेला आहे. त्याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.:-

| पडताळणी अहवाल प्राप्त झालेल्या जिल्हा परिषदांची | कार्यरत एकूण दिव्यांग अधिकारी / | पडताळणी केलेल्या दिव्यांग कर्मचाऱ्यांची संख्या | पडताळणी अंती प्रमाणपत्र नसलेले/ बनावट दिव्यांगत्व प्रमाणपत्र / ४० टक्के पेक्षा कमी दिव्यांगत्व आढळलेल्या अधिकारी / कर्मचाऱ्यांची संख्या |
|---|---|---|---|
| २८ | १०,९२२ | ६२१८ | ३१६ |

पडताळणीअंती प्रमाणपत्र नसलेले/ बनावट दिव्यांगत्व प्रमाणपत्र / ४०% पेक्षा कमी दिव्यांगत्व आढळलेल्या ३१६ अधिकारी / कर्मचाऱ्यांवर शिस्तभंग / दिलेल्या लाभांची वसुली करणे / निलंबन इत्यादी कारवाई करण्यात येत आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**रत्नागिरी जिल्ह्यातील 'लक्ष्मी ऑरगॅनिक' ही प्रदूषणकारी कंपनी बंद करण्याबाबत**

**(२६) * ७६२३ श्री.शशिकांत शिंदे, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.सुनिल शिंदे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.प्रविण दरेकर, श्री.प्रसाद लाड, डॉ.परिणय फुके, श्री.विक्रांत पाटील, श्रीमती चित्रा वाघ, श्री.सदाशिव खोत, श्री.ज्ञानेश्वर म्हात्रे, श्रीमती उमा खापरे, श्री.संजय केणेकर, ॲड.अनिल परब :** सन्माननीय **पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रत्नागिरी जिल्ह्यातील पश्चिम घाटातील पर्यावरणदृष्ट्या संवेदनशील क्षेत्र असलेल्या लोटे परशुराम एमआयडीसीमध्ये इटलीमधून हद्दपार केलेली ‘मिटेनी एस.पी.ए.’ ही रासायनिक कंपनी ‘लक्ष्मी ऑरगॅनिक’ या नावाने सुरू करण्यात आली असल्याची बाब माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर केमिकल कंपनीमधून ‘पीएफएएस’ या अत्यंत घातक विषारी रासायनिक पदार्थाचं उत्पादन घेतलं जात असून माधव गाडगीळ समिती, कस्तुरीरंगन समिती तसेच महाराष्ट्र शासनाच्या राणे समितीच्या शिफारशींचा संदर्भ देऊन पश्चिम घाट आणि कोकणातील पर्यावरणीय समतोल आणि मानवी आरोग्याला दीर्घकालीन धोका निर्माण करणाऱ्या येथील रासायनिक उद्योगांवर कठोर निर्बंध घालण्याची गरज असल्याचे म्हटले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, लक्ष्मी ऑरगॅनिक कंपनीत सुरू असलेले पीएफएएस या घातक रसायनाचे उत्पादन तातडीने व कायमस्वरूपी बंद करण्यात यावे, अशी मागणी पर्यावरणवादी कार्यकर्त्यांनी केली असून या भागातील नागरिकांच्या आरोग्यावर झालेल्या व होऊ शकणाऱ्या परिणामांचे स्वतंत्र आरोग्य व पर्यावरणीय परिणाम अभ्यास करण्याचा विचार शासन करत आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले असून रत्नागिरी जिल्ह्यातील लोटे परशुराम एमआयडीसीत ‘लक्ष्मी ऑरगॅनिक’ ही प्रदूषणकारी कंपनी तातडीने बंद करून इटली या देशाने नाकारलेल्या कंपनीस राज्यात व मानवी वस्ती नजीक परवानगी देणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) इटलीमधून हद्दपार केलेली मिटेनी एस.पी.ए. ही रासायनिक कंपनी लक्ष्मी ऑरगॅनिक या नावाने सुरु करण्यात आली असल्याबाबतची माहिती उपलब्ध नाही. तथापि, मे. लक्ष्मी ऑरगॅनिक इंडस्ट्रीज लिमिटेड हा उद्योग प्लॉट क्रमांक जी-६०, औद्योगिक वसाहत लोटे, ता.खेड, जि.रत्नागिरी येथे कार्यरत आहे.

पश्चिम घाट संवेदनशील क्षेत्राच्या अनुषंगाने माधव गाडगीळ समिती वा कस्तुरीरंगन समितीने शिफारस केलेल्या बाबी / संवेदनशील गावे इ. अद्यापि अंतिम नाहीत. तथापि, केंद्रीय पर्यावरण वने व वातावरणीय बदल मंत्रालयाने निर्गमित केलेल्या दिनांक २०/१२/२०१३ रोजीच्या कार्यालयीन ज्ञापन (ऑफीस ममोरॅन्डम) नुसार पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ मधील शेडयूलनुसार “ लाल संवर्ग ” वर्गवारीतील नवीन उद्योग / अस्तित्वातील उद्योगांचे विस्तारीकरण इ. बाबींना पर्यावरण अनुमती देण्यास बंदी घालण्यात आली असून सदर बाब दिनांक ३१/०७/२०२४ रोजी निर्गमित प्रारुप अधिसूचनेन्वये कायम आहे. सदर प्रारुप अधिसूचनेतील गावांच्या यादीमध्ये सदर ठिकाण येत नसलेबाबत अहवाल महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सादर केला आहे.

मे. लक्ष्मी ऑरगॅनिक इंडस्ट्रीज लि. या उद्योगाच्या ८५०० मेट्रीक टन प्रति वर्ष स्पेशॅलिटी इंटरमिडीएटस इतक्या प्रस्तावित उत्पादनासाठी दिनांक ३१/०३/२०२० अन्वये पर्यावरण अनुमती प्रदान आहे. तसेच महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून सदर प्रकल्प उभारणीसाठी दिनांक २२/०२/२०२१ रोजी संमतीपत्र प्रदान केले आहे.

तद्नंतर मे. लक्ष्मी ऑरगॅनिक इंडस्ट्रीज लि. या नावाने प्राप्त पर्यावरण अनुमतीचे हस्तांतरण मे. यलास्टोन फाईन केमिकल्स प्रा.लि. या नावाने करुन या नावाने उत्पादन सुरु करण्यासाठी आवश्यक संमतीपत्र दिनांक ११/०७/२०२३ रोजी प्राप्त केले असून त्याची वैधता दिनांक ३०/०६/२०२६ पर्यंत आहे.

तद्नंतर मे. यलोस्टेन फाईन केमिकल्स प्रा.लि. या नावाने उत्पादन क्षमतेच्या विस्तारीकरणास कंपनीकडून दिनांक २०/०९/२०२५ रोजी पर्यावरण अनुमती घेण्यात आली आहे. सद्य:स्थितीत मे. यलोस्टोन फाईन केमिकल्स प्रा.लि. यांचे नावे असलेली पर्यावरण अनमुती ही मे. लक्ष्मी ऑरगॅनिक इंडस्ट्रीज लि. यांच्या नावे हस्तांतरीत करणेबाबतचा प्रस्ताव राज्य पर्यावरण आघात मुल्यांकन समितीच्या विचाराधीन आहे.

उद्योग प्रतिनिधीने दिलेल्या माहितीनुसार सदर उद्योगाने डिसेंबर, २०२३ मध्ये व्यावसायिक उत्पादन सुरु केले असून जून-, २०२५ मध्ये एका पीएफएएस संवर्गातील घटकाचे उत्पादन सुरु केले आहे.
(३) व (४) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडे सदर प्रकल्प बंद करण्याबाबतची निवेदने स्थानिक नागरीक व विविध संस्थामार्फत प्राप्त झाली आहेत.

जल (प्रदूषण प्रतिबंध आणि नियंत्रण) कायदा, १९७४ व वायु (प्रदूषण प्रतिबंद आणि नियंत्रण) अधिनियम, १९८१ मधील तरतूदीनुसार महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून उद्योग स्थापना व उद्योग सुरु करण्यासाठीचे संमतीपत्र (Consent to Establish व Consent to Operate) घेणे आवश्यक असून संमतीपत्रातील अटी व शर्तींचे पालन करणे बंधनकारक आहे. सदर संमतीपत्रामध्ये नमूद अटी व शर्तींचे उल्लंघन केल्यास उद्योगांवर जल प्रदूषण (प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, १९७४ व हवा प्रदूषण (प्रतिबंध व नियंत्रण) कायदा, १९८१ अंतर्गत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळामार्फत कारवाई करण्यात येते.

पाण्यात पीएफएएसच्या प्रमाणासाठी कोणतीही विशिष्ट नियमावली नसल्याने महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ पीएफएसची चाचणी आणि देखरेख करत नाही. तथापि, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने सदर उद्योगाच्या सांडपाण्याची चाचणी केली असून सदर उद्योगाचे सांडपाणी संमतीपत्रातील नमुद मानकाच्या मर्यादेत असल्याचे दिसून येते.

सदर कंपनीच्या संमतीपत्रात दिलेल्या अटीनुसार, उद्योगाच्या उत्पादन प्रक्रियेतून निर्माण होणाऱ्या घातक घनकचरा व औद्योगिक सांडपाण्यावर सुरक्षित वैज्ञानिक पध्दतीने साठवणूक करुन, शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट लावण्यात येत असल्याचे, तसेच हवा प्रदूषण नियंत्रण करण्यासाठीची आवश्यक यंत्रणा स्थापित केली असल्याचे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने नमूद केले आहे. तथापि, प्रश्नाधीन विषयाच्या अनुषंगाने शास्त्रोक्त अभ्यास करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून आय.सी.टी. या तज्ञ संस्थेस कार्यादेश देण्यात आले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्यातील बँकिग क्षेत्रातील आर्थिक गैरव्यवहारांमुळे सामान्य खातेधारकांचे पैसे बँकांमध्ये अडकले असल्याबाबत

**(२७) * ६७२३ श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील, श्री.अशोक ऊर्फ भाई जगताप, श्री.जयंत आसगावकर, श्री.सुधाकर अडबाले, श्री.संजय खोडके, श्री.अमोल मिटकरी, श्री.विक्रम काळे, श्री.शिवाजीराव गर्जे, श्री.इद्रिस नायकवडी, श्री.सतिश चव्हाण, डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात बँकिग क्षेत्रातील आर्थिक गैरव्यवहारांमुळे सामान्य खातेधारक चिंताग्रस्त झाले असून यामुळे अनेक खातेधारकांचे पैसे बँकामध्ये अडकले असून, एसबीआयच्या देशभरातील शाखांमध्ये मागील २२ महिन्यांमध्ये १५ हजार ९५६ सायबर गुन्हे घडले असल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सध्या आर्थिक गैरव्यवहारांच्या तुलनेत सायबर आर्थिक गुन्ह्यांमध्ये तीनपट वाढ झाल्यामुळे बँक खातेधारक चिंताग्रस्त झाले असून, बँकिग क्षेत्रात वाढत असलेले सायबर गुन्हे रोखण्याकरीता कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, राज्यातील बँकांतील आर्थिक गैरव्यवहारांमुळे खातेधारकांचे अडकलेले पैसे त्यांना परत मिळण्यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे पाठपुरावा केला आहे काय तसेच सायबर गुन्हे रोखण्याकरीता केलेल्या उपाययोजनांची अंमलबजावणी केली आहे वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) सन २०२४ ते जानेवारी २०२६ पर्यंत राज्यात National Cyber Crime Reporting Portal (NCCRP) व १९३० हेल्प लाईनद्वारे एस.बी.आय. बॅंकेतील खातेसंदर्भात सायबर आर्थिक फसवणूक व त्याकरीता वापरलेल्या एस.बी.आय. बॅंकेचे खाते याबाबत सांख्यिकीय माहिती खालीलप्रमाणे आहे.

| वर्ष | दाखल गुन्हे | म्युल अकाउंट | डिस्प्युटेड रक्कम(कोटी) | होल्ड रक्कम (कोटी) |
|---|---|---|---|---|
| २०२४ | ८४,४३८ | - | ४५० | ९८.४३ |
| २०२५ | १,०६,३१७ | २८,३१,३२७ | ४५०.३७ | ८५.८१ |
| जाने २०२६ | ८८१२ | ५,१०,३३६ | ४१.४३ | ७.३६ |

तसेच सन २०२४ ते २०२५ पर्यंत राज्यात National Cyber Crime Reporting Portal (NCCRP) व १९३० हेल्प लाईनद्वारे दाखल तक्रारी, फसवणूकीची रक्कम, गोठविण्यात आलेली रक्कम खालीलप्रमाणे आहे.

| वर्ष | दाखल तक्रारी | फसवणूक रक्कम(कोटी) | होल्ड रक्कम(कोटी) |
|---|---|---|---|
| २०२४ | २,३२,५३८ | ४०५५.८७ | ४४०.३७ |
| २०२५ | २,८४,२८१ | ३५३६.४३ | ६१७.५२ |

(२) व (३) सन २०२५ मध्ये राज्यात आर्थिक गैरव्यवहारांच्या तुलनेत सायबर आर्थिक गुन्ह्यांमध्ये तीनपट वाढ झाल्याचे दिसून आले नाही.

राज्य शासनाने सायबर फसवणूकीला बळी पडणाऱ्या नागरिकांना विशेषत: महिला, बालके व ज्येष्ठ नागरिकांना केंद्र स्थानी ठेवून अत्याधूनिक तंत्रज्ञान, कुशल मनुष्यबळ आणि संसाधनांनी युक्त अशा उपाय योजनांचा समावेश असलेल्या महाराष्ट्र सायबर सुरक्षा प्रकल्प कार्यान्वित केला आहे.

राज्यभरातील सायबर गुन्ह्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी महापे, नवी मुंबई येथे सायबर सुरक्षा प्रकल्पाचे मुख्यालय तसेच नोडल सायबर पोलीस स्टेशन कार्यरत असून त्याद्वारे राज्यातील ५० जिल्हा सायबर लॅब्स/ पोलीस ठाणे तांत्रिकदृष्ट्या गुंतागुंतीच्या सायबर गुन्ह्यांच्या तपासासाठी कार्यरत आहे.

महाराष्ट्र सायबर कार्यालयाकडून २६ तज्ञ सल्लागारांच्या मदतीने राज्यातील १००० पोलीस अधिकारी व कर्मचारी यांना Forensic Tools चे ऑनलाईन प्रशिक्षण देण्यात आले आहे.

सर्व प्रकारचे सायबर गुन्हे रोखण्याकरीता www.cybercrime.gov.in ही वेबसाईट व सायबर हेल्पलाईन नंबर १९३० बाबत सर्व सामान्य जनतेत महाराष्ट्र सायबरच्या सोशल मिडीया Twitter, Instagram, Facebook, YouTube अकांउट्सद्वारे जनजागृती करण्यात आली आहे.

तसेच राज्यातील ३४ रेल्वे स्थानकांवरून महारेल एलईडी/ एलसीडी स्क्रीनद्वारे सायबर गुन्ह्याबाबत प्रभाविपणे जनजागृती करण्यात येते.

तसेच तक्रारदार यांचे विविध बँक खात्यात फ्रिज असलेले पैसे परत मिळविण्यासाठी संबंधित न्यायालयाकडून आदेश प्राप्त झाल्यावर सदर पैसे संबंधित बँक तक्रारदार यांना परत पाठवत असते.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## धुळे येथील अभियंत्याची कोटयवधी रूपयांची ऑनलाईन फसवणूक झाल्याबाबत

**(२८)** * **७९७७ श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) धुळे शहरातील एका उच्चशिक्षित अभियंत्याला शेअर मार्केटमध्ये मोठ्या परताव्याचे आमिष दाखवत ३ कोटी १४ लाख १९ हजार ८९१ रुपयांची ऑनलाईन फसवणूक केल्याची घटना दिनांक ५ डिसेंबर २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, अवघ्या दहा दिवसांच्या कालावधीत सायबर गुन्हेगारांनी विविध बँक खात्यांद्वारे ही रक्कम ट्रान्सफर करून घेतल्याचे पोलीस तपासात समोर आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, या प्रकरणातील सायबर गुन्हेगारांचा शोध घेण्यासाठी आणि फसवणूक झालेली रक्कम परत मिळवून देण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) सदर घटनेबाबत सायबर पोलीस ठाणे धुळे शहर येथे दिनांक ०३/१२/२०२५ रोजी गु.र.क्र.०८ /२०२५ भारतीय न्याय संहिता कलम ३१८(४), ३१९(२), सह माहिती तंत्रज्ञान अधिनियम कलम ६६(ड) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.
(२) व (३) स्नेहनगर, धुळे येथील तक्रारदार व्यक्तीस दिनांक ०१/१०/२०२५ ते २४/११/२०२५ दरम्यान अज्ञात इसमांनी ऑनलाईन शेअर मार्केट लिंकद्वारे जास्त मोबदला मिळून देण्याचे अमिष दाखविले. तसेच विविध व्हॉट्सॲप क्रमांकाद्वारे मेसेज व लिंक पाठवून ८४८FYERS HNI VIP Growth Hub या व्हॉट्सॲप ग्रुप मध्ये जॉइन करून FYERS INDIA(HNI) ॲप डाऊनलोड करण्यास सांगितले. त्यानंतर फिर्यादीस सदर ॲपद्वारे सुरवातीला काही शेअर्स घेण्यास सांगून त्यास जास्त परतावा मिळवून दिला. तद्नंतर वारंवार अधिक परतावा मिळून देण्याचे अमिष दाखवून वेगवेगळ्या बँक खात्यात एकूण रुपये ३,१४,९९,८९१/- रक्कम RTGS, NEFT व UPI द्वारे वर्ग करुन परतावा दिला नाही. त्यामुळे त्यांची आर्थिक फसवणूक केल्याबाबत उपरोक्त प्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

प्रस्तुत प्रकरणी एका बँक खात्यात ट्रान्सफर झालेली रुपये १,१७,००,०००/- इतकी रक्कम गोठविण्यात आली आहे. सदर रक्कम फिर्यादीस परत मिळणेबाबत मा.न्यायालयाकडून आदेश प्राप्त झाला असून त्यानुषंगाने कार्यवाही सुरू आहे.

तसेच काही बँक खाते धारक हे ऑनलाईन गेम खेळल्याने त्यांनी जिंकलेल्या पैशामध्ये फसवणूकीचे पैसे आले म्हणून त्यांचे बँक खाते गोठविण्यात आले आहे. सदर खातेधारकांची सायबर पोलीस ठाणे येथे ओळख व रहिवासाचा पुरावा याची खात्री केल्यानंतर त्यांनी फिर्यादीस रुपये १,४१,७२९/- इतकी रक्कम परस्पर ऑनलाईन परत केली आहे.

या प्रकरणी आत्ता पर्यंत ७ आरोपी निष्पन्न करण्यात आले आहेत. सदर सायबर फसवणूक करणारी टोळी अन्य गुन्ह्यात अटक झाल्याने आरोपींचा ताबा घेवून पुढील तपास करण्याची कार्यवाही सुरू आहे. त्यांच्या बॅंक अकाउंटवर ट्रान्सफर केलेल्या पैशांचा तपास सुरू आहे. सदर रक्कम सुमारे रुपये १,५१,७०,८६८/- इतकी आहे.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील समृद्धी महामार्गावरील खाजगी स्लीपर कोच बसच्या दुर्घटनेची चौकशी करण्याबाबत

**(२९)** * **६६८१ श्री.सत्यजीत तांबे, श्री.सुनिल शिंदे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील समृद्धी महामार्गावर मुंबईहून बुलढाण्याकडे जाणाऱ्या ३२ प्रवासी असलेल्या खाजगी स्लीपर कोच बसला अचानक आग लागून बस पूर्णतः खाक झाली असून सदर दुर्घटनेत एका प्रवाशाचा मृत्यू व एक प्रवासी गंभीर जखमी झाले असल्याची दुर्घटना दिनांक २ जानेवारी, २०२६ रोजी वा त्यासुमारास घडल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर खाजगी बसमध्ये अग्निसुरक्षा यंत्रणा, आपत्कालीन बाहेर पडण्याची प्रभावी व्यवस्था व तातडीचा इशारा देणारी यंत्रणा अपुरी असल्यामुळे ही गंभीर दुर्घटना घडल्याचे निदर्शनास आले असून, राज्यात यापूर्वीही स्लीपर कोच बसला आग लागून प्रवाशांचे मृत्यू झाल्याच्या घटना विविध महामार्गावर घडल्याचे वेळोवेळी निदर्शनास येऊनही शासनाकडून अशा घटनांची एकत्रित चौकशी करण्यात दुर्लक्ष झाले असल्याचे आढळून आले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, अनेक देशांमध्ये प्रवासी सुरक्षेच्या कारणास्तव स्लीपर कोच बसेसवर बंदी घालण्यात आली आहे, मात्र राज्यात प्रवासी सुरक्षेला महत्व देण्यात येत नसल्याने खाजगी बसेसच्या रचना व परवान्यांकरीता कोणतेही ठोस निकष, सुधारित सुरक्षा मानके वा विशेष तपासणी मोहीम राबविण्याबाबत शासनाने कठोर नियमांची प्रभावी अंमलबजावणी करण्याकरीता कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(४) असल्यास, शासनाने सदर प्रकरणी चौकशी करून समृद्धी महामार्गावरून मुंबईहून बुलढाण्याकडे जाणाऱ्या खाजगी बसच्या दुर्घटनेस जबाबदार संबंधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक :** (१) होय.
(२) सदर प्रकरणात गुन्हा नोंद करण्यात आलेला असून सदर गुन्हयानुसार बसमधील प्रवासी संख्या २९ इतकी आहे. अपघात घडलेल्या वाहनाची प्रत्यक्ष तपासणी वैजापूर उप प्रादेशिक परिवहन कार्यालयाचे मोटार वाहन निरीक्षक यांचेकडून करण्यात आली असून अपघात झालेल्या वाहनामध्ये अग्निसुरक्षा यंत्रणा उपलब्ध असल्याचे आढळून आले. तसेच आपत्कालीन परिस्थितीत बाहेर पडण्याची प्रभावी व्यवस्था सदर वाहनामध्ये आढळून आली.

(३) व (४) स्लीपर कोच नोंदणी करताना तसेच योग्यता प्रमाणपत्र जारी करताना केंद्रीय मोटार वाहन नियम, १९८९ चे नियम १२५ (C) मधील सुधारीत तरतुदीनुसार AIS:११९ व AIS:०५२ मधील अटी व मोजमापाप्रमाणेच पुर्नतपासणी करण्याबाबतच्या सूचना जारी करण्यात आल्या आहेत. केंद्र शासन अधिसूचना क्र. G.S.R. १५९(E) नुसार २२ किंवा त्यापेक्षा अधिक आसन क्षमता (चालक वगळता) असलेल्या बसचे बॉडी बिल्डींग AIS-१५३ प्रमाणे असणे आवश्यक आहे तसेच अशा सर्व वाहनांच्या प्रोटोटाईपला केंद्रीय मोटार वाहन नियम, १९८९ च्या नियम १२६ मध्ये नमूद मान्यता प्राप्त संस्था यांच्याकडून मान्यता घेणे आवश्यक आहे.क्षेत्रिय कार्यालयाच्या वायुवेग पथकाद्वारे स्लीपर कोच वाहनांची तपासणी करण्याबाबत वेळोवेळी सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत. एप्रिल २०२५ ते जानेवारी २०२६ पर्यंत एकूण १२४१८ दोषी आढळलेल्या खाजगी बसेसवर कारवाई करण्यात आली आहे.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भंडारा जिल्ह्यात 'मागेल त्याला सौर कृषीपंप' योजनेची अंमलबजावणी करणेबाबत

**(३०) * ८२०९ डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) भंडारा जिल्ह्यात 'मागेल त्याला सौर कृषीपंप' या योजनेंतर्गत एकूण ४,५०० शेतकऱ्यांनी अर्ज केले असून, त्यापैकी माहे जानेवारी २०२६ पर्यंत २,९९७ शेतकऱ्यांच्या शेतात पंप कार्यान्वित झाले आहेत, मात्र उर्वरित १,५०३ शेतकरी अद्याप सौर कृषीपंपाच्या प्रतीक्षेत असल्याचे माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, तालुकानिहाय आकडेवारी पाहता लाखनी ४५७, मोहाडी ६४९, साकोली ३३०, तुमसर ३२३, भंडारा २९९, लाखांदूर ४५५ व पवनी तालुक्यात ९९ शेतकरी प्रतीक्षेत असून, या विलंबामुळे त्यांना सिंचनासाठी महागड्या डिझेलवर किंवा अनियमित वीजपुरवठ्यावर अवलंबून राहावे लागत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सौर पंप वेळेत न मिळाल्याने पिकांचे नुकसान, सिंचन खर्चात वाढ आणि पर्यायाने शेतकऱ्यांवर आर्थिक संकट ओढवत असून योजनेचा मूळ हेतू शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवणे बाधित होत असून केंद्राचे व राज्याचे भरीव अनुदान असताना व शेतकऱ्यांनी स्वतःचा ५ ते १० टक्के हिस्सा भरला असूनही, केवळ निधीचा अभाव, तांत्रिक अडचणी किंवा वितरणातील दिरंगाईमुळे या उर्वरित शेतकऱ्यांना लाभ मिळत नसल्याचेही निदर्शनास आले आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, भंडारा जिल्ह्यातील प्रतिक्षेत असणाऱ्या १,५०३ शेतकऱ्यांसह राज्यातील शेतकऱ्यांना सौर कृषीपंप देण्यासाठी कोणती निश्चित कालमर्यादा ठरवण्यात आली आहे आणि भविष्यात अशा योजनांची वेळेत अंमलबजावणी व्हावी यासाठी शासनाने कोणती कार्यवाही /उपाययोजना केली आहे वा करण्यात येत आहेत,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?
**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) होय, हे खरे आहे.

भंडारा जिल्ह्यात 'मागेल त्याला सौर कृषीपंप' या योजनेंतर्गत आजपर्यंत एकूण ४,८४१ अर्ज प्राप्त झाले असून त्यापैकी एकूण ३१७७ पंप आस्थापित करण्यात आले आहे व १५१३ लाभार्थ्यांनी पुरवठादाराची निवड केलेली असून उर्वरीत १५१ लाभार्थ्यांची पडताळणी असे एकूण १६६४ लाभार्थ्यांचे काम प्रगतीपथावर आहे.

(२) हे खरे नाही.

आज अखेरपर्यंत "मागेल त्याला सौर कृषी पंप" योजनेंतर्गत तालुकानिहाय लाखनी ४७६, मोहाडी २०९, साकोली २७९, तुमसर २३७, भंडारा १८८, लाखांदूर २०८ व पवनी तालुक्यात ६७ पंप आस्थापित करण्यात आलेले आहेत. उर्वरित सौर पंप मार्च, २०२६ पर्यंत आस्थापित करण्यात येणार आहेत.

(३) व (४) हे खरे नाही.

व्हेंडर ला कार्यादेश मिळाल्यापासून २ महिन्याचे आत सौर पंप बसविणे आवश्यक आहे. निविदेच्या अटी व शर्तीनुसार विहित मुदतीत पुरवठादारांकडून सौर कृषी पंप आस्थापित करण्यात दिरंगाई व उशीर झाल्यास संबंधित पुरवठादारास सौर कृषी पंप किमतीच्या १०% मर्यादेपर्यंत दंड आकारण्यात येतो.

(५) लागू नाही.

-----------------

## सेतू सुविधा केंद्र व सीएससी चालक शेतकरी व लाडक्या बहिणींकडून अधिक रक्कम घेत असल्याबाबत

**(३१)** * **६७५२ श्री.हेमंत पाटील, श्री.कृपाल तुमाने :** सन्माननीय **महसूल मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) शासनाने शेतकऱ्यांना प्रत्येक अनुदानासाठी फार्मर आयडी व लाडक्या बहिणींना पुढील हप्त्याच्या लाभाकरीता ईकेवायसी करणे बंधनकारक केल्यामुळे शेतकऱ्यांनी या दोन्ही कामासाठी सेतू सुविधा केंद्रावर व सीएससी केंद्रावर गर्दी केल्यामुळे सदर गर्दीचा फायदा घेत सेतू सुविधा केंद्र चालक व सीएससी चालक शेतकऱ्यांकडून व लाडक्या बहिणींकडून अधिक रक्कम घेण्यात येत असल्याचे निदर्शनास आले असून याबाबत अनेक तक्रारी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडे करण्यात आल्या असल्याचे माहे डिसेंबर, २०२५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शेतकऱ्यांना प्रत्येक अनुदानासाठी फार्मर आयडी व लाडक्या बहिणींना पुढील हप्त्याच्या लाभाकरीता ई-केवायसी आवश्यक असल्याने ते सुलभरित्या उपलब्ध करुन देण्यासंदर्भात शासनस्तरावर कोणती उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(३) असल्यास, सदरहू प्रकरणी संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडे प्राप्त झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने शासनाने चौकशी करुन लाभार्थ्यांची लूट करणाऱ्या सेतू सुविधा केंद्र व सीएससी चालकांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.चंद्रशेखर बावनकुळे :** (१) सातारा जिल्ह्यातील फलटण तालुक्यात फार्मर आयडीसाठी शेतकऱ्यांकडून पैसे घेत असल्याबाबत निवेदन प्राप्त झाले आहे.

(२) आपले सरकार सेवा केंद्र चालक व सीएससी केंद्रचालक यांना त्यांच्या केंद्रांवर येणा-या शेतक-यांना तसेच सर्वसामान्य जनतेला विनाशुल्क ई-केवायसी करण्याबाबत वेळोवेळी शासनस्तरावरुन देण्यात आलेल्या सूचनांचे पालन करण्याबाबत तसेच आपले सरकार सेवा केंद्र व सीएससी केंद्रांवर प्रभावी नियंत्रण ठेवण्याबाबत जिल्हाधिकारी यांनी दक्षता घेण्यात यावी असे कळविण्यात येत आहे.

(३) सातारा जिल्ह्यातील फलटण तालुक्यात फार्मर आयडीसाठी शेतकऱ्यांकडून पैसे घेत असल्याबाबत प्राप्त झालेल्या निवेदनाच्या अनुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालय, सातारा यांच्या दिनांक २० फेब्रुवारी, २०२६ च्या पत्राव्दारे उप विभागीय अधिकारी, फलटण यांना आपले सरकार सेवा केंद्राची व जिल्हा समन्वयक CSC-SPV यांना सी.एस.सी. केंद्राची तपासणी करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## हिंगोली जिल्ह्यातील शेतकऱ्यांची सौर कृषीपंपासाठी कंत्राटदारांकडून आर्थिक पिळवणूक होत असल्याबाबत

**(३२) * ८०५९ श्री.प्रसाद लाड, श्री.प्रविण दरेकर, श्रीमती उमा खापरे, ॲड.निरंजन डावखरे, श्री.संजय केणेकर :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) हिंगोली जिल्ह्यात शेतकऱ्यांना दिवसा वीज मिळण्यासाठी पीएम कुसुम व मुख्यमंत्री सौर कृषी पंप महत्त्वाकांक्षी योजनेतंर्गत सौर कृषी पंप बसविण्याची जबाबदारी ठेकेदार व संबंधित कंपनीची असताना खड्डे खोदण्यापासून साहित्य आणण्याच्या सर्व खर्च शेतकऱ्यांना करावा लागत आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर बाबतीत कंत्राट घेतलेल्या एजन्सी व ठेकेदाराकडून सौर कृषी पंपासाठी शेतकऱ्यांची पिळवणूक होत असल्याबाबत समर्थन संस्थेने मा.मंत्री, मुख्यमंत्री, मा.राज्यमंत्री (ऊर्जा) तसेच उप मुख्य सचिव (ऊर्जा) यांच्याकडे दिनांक ३१ डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान लेखी निवेदनाद्वारे तक्रार केली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी शेतकऱ्यांची पिळवणूक करणाऱ्या दोषी ठेकेदारांवर शासनाने कोणती प्रशासकीय वा दंडात्मक कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे नाही.
(२) हे अंशत: खरे आहे.

पीएम कुसुम व मुख्यमंत्री सौर कृषी पंप योजनेंतर्गत कंत्राट घेतलेल्या एजन्सी व ठेकेदाराकडून सौर कृषी पंपासाठी शेतकऱ्यांची पिळवणूक होत असल्याबाबत समर्थन संस्थेचे निवेदन प्राप्त झाले आहे. तसेच महावितरणकडे २ तक्रारी प्राप्त झाल्या होत्या. सदर दोन्ही तक्रारीची शहानिशा केल्यानंतर संबंधितांना सौर पंप बसवून दिलेला असल्यामुळे, कोणतीही तक्रार प्रलंबित नसल्याचे तक्रारदारांनी कळविले आहे.
(३) शेतकऱ्यानी सौर पंपावरील नियत खर्चाव्यतिरिक्त कोणताही अतिरिक्त खर्च करु नये, असे आवाहन करण्यात येत आहे. सदर योजनेंतर्गत लाभार्थ्यांमध्ये जनजागृती करणेबाबत प्रत्येक उपविभागात सौर पंप लाभार्थ्यांचे तालुकास्तरावर मेळावे घेतले आहेत.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## भुसावळ येथील दीपनगर औष्णिक ऊर्जा केंद्रात ८०० मेगावॅट क्षमतेचा सुपर क्रिटीकल संच उभारण्याबाबत

**(३३)** * ८०२० **श्री.एकनाथराव खडसे :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) भुसावळ (जि.जळगाव) येथील दीपनगर औष्णिक ऊर्जा केंद्रातील जुना व कालबाह्य ठरलेला २१० मेगावॅट क्षमतेचा संच क्रमांक ३ हा कार्यक्षमतेत घट, वाढलेला देखभाल खर्च व पर्यावरणीय निकषांमुळे टप्प्याटप्प्याने बंद करण्याचा निर्णय घेण्यात येत असून, त्याजागी अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारित नवीन ८०० मेगावॅट क्षमतेचा 'सुपर क्रिटिकल' संच उभारण्याचा प्रस्ताव महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी वा शासनाच्या विचाराधीन असल्याचे माहे डिसेंबर २०२५ वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर नवीन संच उभारणीसाठी आवश्यक असलेली जमीन उपलब्धता, पाणीपुरवठा, कोळसा पुरवठा, पर्यावरणीय मंजुरी, राख व्यवस्थापन तसेच इतर पायाभूत सुविधांच्या उपलब्धतेबाबत संबंधित विभागामार्फत सर्वेक्षण व तांत्रिक अभ्यास पूर्ण करून त्याचा सविस्तर अहवाल शासनास सादर करण्यात आला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर प्रकल्प उभारणीसाठी शासनाने आतापर्यंत कोणती प्रशासकीय, तांत्रिक व आर्थिक कार्यवाही केली आहे, तसेच प्रकल्पाच्या मंजुरी, निधी उपलब्धता, निविदा प्रक्रिया व प्रत्यक्ष कामास प्रारंभ करण्याबाबत कार्यवाही प्रस्तावित आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, सदर प्रकल्पास मंजुरी व प्रत्यक्ष अंमलबजावणी होण्यास विलंब होत असून ती पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही वा उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) संच क्रमांक ३ च्या जागेवर अत्याधुनिक तंत्रज्ञानावर आधारीत नवीन ८०० मेगावॅट क्षमतेचा सुपर क्रिटीकल संच उभारण्याचा प्रस्ताव महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनीच्या विचाराधीन आहे.

तथापि, केंद्रीय विद्युत प्राधिकरणाने (CEA) दिनांक ०२/०९/२०२२ व दिनांक २०/०१/२०२३ रोजीच्या पत्रान्वये कोळश्यावर आधारित जुने संच किमान सन २०३० पर्यंत निवृत्त करू नयेत असे निर्देश दिले आहेत. त्यामुळे सदर संच बंद करण्यात आलेला नाही.

(२) महानिर्मिती कंपनीद्वारे सदर प्रस्तावित १x८०० मेगावॅट संचाची तांत्रिक व वाणिज्यिक व्यवहार्यता तपासण्यासाठी सल्लागाराची नियुक्ती करण्यात आली आहे. अद्याप सविस्तर अहवाल शासनास प्राप्त झालेला नाही.

(३), (४) व (५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## राज्य मार्ग परिवहन महामंडळामार्फत शालेय सहलींसाठी सुस्थितीत असलेल्या बसेस उपलब्ध करून देण्याबाबत

**(३४) * ६६९० श्री.सत्यजीत तांबे :** सन्माननीय **परिवहन मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जेजुरी (ता.नगर, जि.अहिल्यानगर) येथील श्री संतुकनाथ इंग्लिश विद्यालयाची माहे डिसेंबर, २०२५ मध्ये आयोजित केलेली शैक्षणिक सहल राज्य मार्ग परिवहन महामंडळाने पुरविलेल्या नादुरुस्त बसमुळे अर्धवट सोडून विद्यार्थ्यांना माघारी फिरावे लागल्याची घटना घडली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर सहलीदरम्यान एसटी बस तब्बल सहा वेळा नादुरुस्त झाल्याने विद्यार्थ्यांना कडाक्याच्या थंडीत महामार्गावर ताटकळत राहावे लागल्याने त्यांच्या आरोग्याच्या समस्या निर्माण झाल्या तसेच विद्यार्थ्यांच्या सहल शुल्काचाही अपव्यय झाला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, राज्य शासनाने शाळांना खाजगी तत्त्वावरील बसेस घेण्यास मनाई करून केवळ एसटी महामंडळाच्या बसेस वापरण्याचे बंधन घातले असताना, महामंडळाकडून तांत्रिक तपासणी न केलेल्या जुन्या व नादुरुस्त बसेस पुरवून विद्यार्थ्यांच्या जीविताशी खेळ केला जात आहे, हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, शासनाने शालेय सहलींसाठी केवळ नवीन बसेस राखीव ठेवण्याचे आश्वासन दिले असतानाही, तारकपूर आगार व संबंधित विभागाच्या ढिसाळ नियोजनामुळे शाळांना व शिक्षकांना मनस्ताप सहन करावा लागत असून सदर घटनेच्या कारणांची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व त्याअनुषंगाने पुढे कोणती कार्यवाही वा उपाययोजना करण्यात येत आहे,

(५) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.प्रताप सरनाईक :** (१), (२) व (३) श्री.संतूकनाथ इंग्लिश विद्यालयाच्या शैक्षणिक सहलीकरीता रा.प. तारकपूर आगारातील ०५ सुस्थितीत असलेले वाहने उपलब्ध करून देण्यात आले. प्रत्येक बसचा करार ९०० कि.मी. चा होता.प्रवासाचा मार्ग जेऊर-महाड-पाली-बिर्ला मंदिर-मुरूड-जंजीरा-दिवे आगार-हरिहरेश्वर-जेऊर असा होता.

सदर सहलीकरीता पुरविण्यात आलेल्या ०५ बसेस पैकी एका बसमध्ये बिघाड झाल्यामुळे श्रीवर्धन येथून बस घेवून पुढील नियोजीत सहल पूर्ण करण्यात आली.

सदर बसेसच्या बिघाडामुळे झालेल्या विलंबासाठी कोणताही विलंब आकार घेण्यात आला नाही.

(४) व (५) सदर प्रकरणी रा.प. तारकपूर आगाराच्या वाहन क्र.एमएच ४० एक्यु ६०१५ ची दैनिक तपासणी करणाऱ्या यांत्रिक कर्मचाऱ्यावर वसूलीची दंडात्मक कारवाई करण्यात आलेली आहे.

रा.प. वाहने मार्गस्थ बिघाड होऊ नये म्हणून वाहनांची नियतकालिक कार्यक्रमानुसार देखभाल करण्यात येते व निदर्शनास आलेल्या दोषांबाबत आवश्यक ती दुरूस्ती करून सुस्थितीत असलेली वाहने मार्गावर देण्यात येतात. वाहन मार्गस्थ बिघाड झाल्यास सदर वाहनाची त्वरीत दुरूस्ती करून देण्यात येते अथवा आवश्यकतेनुसार पर्यायी वाहन उपलब्ध करून देण्यात येते.

-----------------

## राज्यातील अपारंपरिक ऊर्जा निर्मिती धोरण-२०२० अंतर्गत सहवीज निर्मिती प्रकल्पांचे उद्दिष्ट पूर्ण करण्याबाबत

**(३५) * ८२११ डॉ.परिणय फुके :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राज्यात अपारंपरिक ऊर्जा निर्मिती धोरण-२०२० अंतर्गत उसाच्या चिपाडावर आधारित सहवीज निर्मिती प्रकल्पांकरीता सन २०२७ पर्यंत १३५० मेगावॅट वीज निर्मितीचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून माहे एप्रिल, २०२५ पर्यंत महानिर्मितीकडून केवळ ५०२ मेगावॅट क्षमतेचे सामंजस्य करार झाले असल्याची बाब माहे जानेवारी, २०२६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, महानिर्मितीने माहे एप्रिल, २०२५ पर्यंत केवळ ५०२ मेगावॅट क्षमतेचे सामंजस्य करार केले असून त्यापैकी केवळ ४०१ मेगावॅट क्षमतेचे प्रकल्प कार्यान्वित झाल्याने शासनाच्या धोरणात्मक उद्दिष्टांच्या अंमलबजावणीत बेकायदेशीररित्या दिरंगाई करण्यात येत आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकल्पांच्या संथ गतीमुळे व नियोजनाच्या अभावामुळे सन २०२७ पर्यंतचे निर्धारित उद्दिष्ट साध्य होण्याबाबत साशंकता निर्माण झाली असून, यामुळे सौर व इतर अपारंपरिक ऊर्जा साधनांच्या विकासावर विपरीत परिणाम होत आहे, हे ही खरे आहे काय,
(४) असल्यास, या संपूर्ण प्रकाराची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय निष्पन्न झाले व उर्वरित उद्दिष्ट वेळेत पूर्ण करण्यासाठी तसेच सहवीज निर्मिती प्रकल्पांच्या नोंदणीसाठी सुरू करण्यात आलेल्या ‘एक खिडकी’ योजनेच्या कार्यपध्दतीत सुधारणा करण्याबाबत कोणती कार्यवाही व उपाययोजना केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) हे खरे आहे.
(२), (३) हे खरे नाही.

अपारंपरिक ऊर्जा धोरण-२०२० नुसार सहवीज निर्मितीचे उद्दिष्ट पूर्ण होईपर्यंत निविदा प्रक्रिया न करता मा.महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाद्वारे निश्चित केलेल्या दराने व विहित केलेल्या अटी व शर्तींवर सामंजस्य करारान्वये महावितरणकडून वीज खरेदी करण्यात येते. त्यानुषंगाने ज्या सहवीज निर्मिती प्रकल्पांनी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केली आहे, अशा सर्व सहवीज निर्मिती प्रकल्पांसमवेत वीज खरेदी करार करण्यात आले आहेत.

एप्रिल, २०२५ पर्यंत महावितरणने ५०१.५ मेगावॅट क्षमतेचे सामंजस्य करार केले असून त्यापैकी ४५४ मेगावॅट क्षमतेचे प्रकल्प कार्यान्वित झाले आहेत. तसेच, आतापर्यंत एकूण ५८१.७५ मेगावॅट क्षमतेच्या प्रकल्पांसोबत सामंजस्य वीज खरेदी करार करण्यात आले असून, त्यापैकी ४९१ मेगावॅट क्षमतेचे प्रकल्प कार्यान्वित झाले आहेत.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.
(५) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## उमरी (जि.नांदेड) तालुक्यातील ११ गावांतील वीज पुरवठा महावितरण कंपनीने बंद केल्याबाबत

**(३६)** * **७९९६ श्री.हेमंत पाटील :** सन्माननीय **मुख्यमंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उमरी (जि.नांदेड) तालुक्यातील ११ गावांतील वीजदेयकांची २५ टक्केच्या जवळपास थकबाकी झाल्यामुळे महावितरण कंपनीने माहे डिसेंबर, २०२५ रोजी वा त्यादरम्यान अखेर उक्त गावातील वीज पुरवठा बंद केल्याचे उघडकीस आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त गावांमध्ये वीज पुरवठ्याअभावी ग्रामस्थ, विद्यार्थी तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र, व्यावसायिक यांना अंधारात रहावे लागत असून त्यांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत असून थकबाकीदार ग्राहकांवर कारवाई करण्याऐवजी संपूर्ण गावाचा वीजपुरवठा खंडित केल्यामुळे नियमित वीज देयके भरणाऱ्या ग्राहकांनाही नाहक त्रास सहन करावा लागत असल्याची बाब शासनाच्या निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करून महावितरणच्या संबंधित अधिकाऱ्यांकडून नियमबाह्य अथवा मनमानी पध्दतीने वीजपुरवठा खंडित केल्याचे आढळल्याने त्यांच्यावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.देवेंद्र फडणवीस :** (१) व (२)"उमरी तालुक्यातील ११ गावे तीन दिवसांपासून अंधारात" अशा आशयाची बातमी दैनिक वृत्तपत्रात दिनांक २९/१२/२०२५ रोजी प्रसिध्द झाली होती.

उमरी तालुक्यातील (जि.नांदेड) ९ गावातील एकूण २१८१ वीज ग्राहकांकडे रुपये ४५.०९ लाख इतकी थकबाकी असल्याने व सदर नऊ गावात घरगुती, वाणिज्य इ. वीज बिले भरणा होत नसल्याने महावितरण कंपनीने विद्युत अधिनियम, २००३ मधील कलम ५६ (१) च्या तरतुदींनुसार, दिनांक २५/१२/२०२५ ते दिनांक २८/१२/२०२५ दरम्यान थकबाकीदार ग्राहकांस नोटिस देऊन वीज वसुली मोहिम राबविण्यात आली होती. यामध्ये माहे डिसेंबर-२०२५ मध्ये उक्त गावातील थकबाकीदार ग्राहकांचा वीज पुरवठा तात्पुरत्या स्वरुपात बंद केला होता.सदर नऊ गावात राबविण्यात आलेल्या रोहित्र पातळीवरील वीज बिल वसुली दरम्यान रुपये ४५.०९ लाख थकबाकीपैकी रुपये ३५.२५ लाख वीज बिल वसुली झाली आहे. वीज बिल भरणा केलेल्या ग्राहकांचा वीज पुरवठा तात्काळ सुरू केला आहे.
(३) व (४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**विधान भवन :**
**मुंबई.**

**डॉ. विलास आठवले**
**सचिव-३,**
**महाराष्ट्र विधानपरिषद**

मुद्रणपूर्व सर्व प्रक्रिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर करण्यात आली आहे.
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.